CMYK

# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि.१४ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मुंबईत होणार 'आशा भोसले संगीत अकॅडमी'

### मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; वांद्रे-अंधेरी दरम्यान जागेचा शोध घेण्यासाठी म्हाडाला आदेश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई दि. १३ एप्रिल** : ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर, त्यांनी व्यक्त केलेली एक मोठी इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुंबईत राज्य सरकारच्या वतीने 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करण्यात येणार असून, मंत्रिमंडळाच्या सोमवारी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर मोहोर उमटवण्यात आली. वांद्रे ते अंधेरी दरम्यान या अकॅडमीसाठी हक्काची जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत.



आशा भोसले यांनी आपल्या हयातीत राज्य सरकारकडे मुंबईत एका जागतिक दर्जाच्या संगीत अकॅडमीसाठी मागणी केली होती. वांद्रे आणि अंधेरी दरम्यानच्या परिसरात यासाठी जागा मिळावी, अशी त्यांची आग्रही विनंती होती. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी आशाताईंच्या स्मारकाचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर भाष्य करताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, केवळ पारंपरिक स्मारक उभारण्यापेक्षा आशाताईंनी स्वतः दिलेला संगीत अकॅडमीचा प्रस्ताव पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.या निर्णयानुसार, संगीत क्षेत्रातील नवोदित कलाकारांना प्रशिक्षण देण्यासाठी ही अकॅडमी मैलाचा दगड ठरणार आहे. या प्रकल्पासाठी योग्य जागेचा शोध घेण्याची जबाबदारी म्हाडाकडे सोपवण्यात आली आहे. वांद्रे ते अंधेरी या पट्ट्यात शासकीय भूखंड उपलब्ध करून देऊन तिथे अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशी ही वास्तू उभारली जाईल.

## संसदेचे विशेष अधिवेशन, भाजपच्या खासदारांसाठी व्हिप

नवी दिल्ली : संसदेचे विशेष अधिवेशन १६ ते १८ एप्रिल या कालावधीत होणार आहे. या अधिवेशनाकरिता भारतीय जनता पक्षाने खासदारांसाठी तीन ओळींचा व्हिप जारी केला आहे.

विशेष अधिवेशनात कामकाजासाठी हजर राहा असे स्पष्ट निर्देश भाजपने पक्षाच्या सर्व खासदारांना दिले आहेत. विशेष अधिवेशनात महिला आरक्षण विधेयक सादर होण्याची शक्यता आहे. गुरुवार ते शनिवार, १६ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीसाठी लोकसभा आणि राज्यसभेतील सर्व भाजप सदस्यांना तीन ओळींचा व्हिप बजावण्यात आला आहे. व्हिपचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश भाजपने । दिले आहेत. हा व्हिप पंतप्रधान मोदींसह लोकसभा आणि राज्यसभेतील सर्व सदस्यांना बंधनकारक आहे.नारी शक्ती वंदन कायद्याने महिलांचे आरक्षण नवीन जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडले होते. कोरोना संकटामुळे जनगणनेला विलंब झाल्याने २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार देशात महिला आरक्षण लागू करण्यासाठी विशेष अधिवेशनात विधेयक सादर होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात...

### वैद्यकीय मदत होणार सोपी

मुंबई : मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षासाठी आता ऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. या नवीन प्रणालीमुळे वैद्यकीय मदतीसाठी अर्ज मंजुरीची प्रक्रिया अवघ्या ८ तासांत पूर्ण होणार असून, लवकरच रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रणालीचं उद्घाटन करण्यात येणार आहे. नव्या व्यवस्थेनुसार रुग्णाला स्वतंत्रपणे अर्ज करण्याची गरज राहणार नाही. संबंधित रुग्णालयच रुग्णाची कागदपत्रे तपासून अर्ज थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठवणार आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद होणार आहे.

### कच्च्या तेलाच्या दरात वाढ

मुंबई : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर दिसू लागला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा निष्फळ ठरल्याने तसेच होर्मुज सामुद्रधुनीत नाकेबंदीची शक्यता निर्माण झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. सोमवारी सुरुवातीच्या व्यवहारात ब्रेंट क्रूडचा दर सुमारे ८ टक्क्यांनी वाढून १०४ डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेला. तर यूएस बेंचमार्क वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडमध्येही ८.६ टक्क्यांची उसळी पाहायला मिळाली.

### सोन्या-चांदीच्या दरात चढ-उतार

मुंबई : पाकिस्तानच्या इस्लामाबाद येथे झालेली इराण आणि अमेरिका यांच्यातील शांतता चर्चा निष्फळ ठरल्याने जागतिक तणाव पुन्हा वाढला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज सामुद्रधुनीच्या नाकाबंदीचे आदेश दिल्याची चर्चा असून, इराणविरोधात आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडींचा परिणाम आता आर्थिक क्षेत्रावरही दिसून येत आहे.आठवड्याच्या सुरुवातीलाच भारतात सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. नवी दिल्ली येथे २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,५२,९८० रुपये असून, मुंबईमध्ये तो १,५२,८३० रुपये आहे. मात्र गेल्या आठवड्यात सोन्याच्या किमतीत मोठी वाढ झाली होती.

### वेतनवाढीवरून आंदोलन

नवी दिल्ली : उत्तर प्रदेश मधील नोएडा येथे वेतनवाढीच्या मागणीसाठी कारखाना कामगारांनी केलेल्या आंदोलनाने आज (सोमवार १३ एप्रिल) हिंसक रूप धारण केले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, विविध औद्योगिक युनिट्समधील मोठ्या संख्येने कामगार एकत्र येत पगारवाढीच्या प्रलंबित मागणीसाठी निदर्शने करत होते. आंदोलनादरम्यान कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली. मात्र काही आंदोलनकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत मालमत्तेची तोडफोड केली, दगडफेक केली आणि एका वाहनाला आग लावली.सध्या ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने परिस्थिती तणावपूर्ण असली तरी नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### महिलेवर अत्याचार

पुणे : पुण्यामधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यातील स्वारगेट परिसरात एका भोंदूबाबानं चक्क अंगात देवी शक्ती असल्याचं भासवून एका विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीनं केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडित महिलेकडून तब्बल ५० लाख रुपये देखील उकळले आहेत. याप्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी औदुंबर मनोहर गडदे याचा शोध सुरु आहे.

### ट्रम्पने वाढवली चिंता

वॉशिंग्टन : गेल्या एका महिन्याहून अधिक काळापासून आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारात मोठी उलथापालथ होताना दिसत आहे. गुंतवणूकदार आणि ग्राहक या दोघांमध्ये कच्च्या तेल आणि गॅसच्या किमतींच्या भविष्यातील दिशेबद्दल अनिश्चित पाहायला मिळत असताना या दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका वक्तव्याने कमोडिटी बाजारातील चिंता आणखी वाढवली आहे. मध्यावधी निवडणुका अगदी तोंडावर असताना ऊर्जा किमतींमध्ये कोणतेही मोठे बदल अपेक्षित असू शकतात, असे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत.

### तरुणाची आत्महत्या

बंगळुरु : बीकॉम पदवीधर तरुणाने आपल्या राहत्या घरी आयुष्याची अखेर केल्याचा प्रकार समोर आला आहे. कर्नाटकातील बंगळुरु शहरात येलाहंका न्यू टाउन येथील अत्तूर लेआउटमध्ये ९ एप्रिल रोजी हा प्रकार घडला. अभिषेक नामक २४ वर्षीय तरुणाने जीव देण्यापूर्वी लिहिलेल्या शेवटच्या चिठ्ठीत आपल्या प्रेयसीवर आरोप केले आहेत. प्रेयसीने प्रेमात दगा दिल्यानंतर आपण नैराश्यात होतो, असं अभिषेकने चिठ्ठीत म्हटलं आहे. जीव देण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चाकणकरांची ८ तास चौकशी

नाशिक : शिर्डी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर व मुलगा चिन्मय यांची ८ तास चौकशी करत जबाब नोंदवले. समता पतसंस्थेत त्यांच्या नावावर चार संशयास्पद खात्यांमधून सुमारे २.४० कोटींचे व्यवहार उघड झाले.

## कल्याण-नगर महामार्ग अपघातात एका कुटुंबातील तिघांसह अन्य एकाचा मृत्यू

कल्याण : कल्याण-मुरबाड मार्गावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना सोमवारी घडली. एक सिमेंट मिक्सर आणि काळी-पिवळी ईको टॅक्सी यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, ईको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून गाडीचा सांगाडा ओळखणेही कठीण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रायते येथील पांजरा पुलावर सकाळी ११ च्या सुमारास ही घटना घडली. ईको गाडीतून मुरबाडमधील काही रहिवासी कल्याणच्या दिशेने जात होते. याच दरम्यान पांजरा पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरने कारला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एक आजी आश्चर्यकारकरीत्या बचावल्या आहेत. प्रवाशांनी भरलेल्या ईको कारला झालेली धडक इतकी भीषण होती की, कारमधील प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या कारमध्ये एकूण १२ प्रवासी होते, त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली. या अपघातात मृतांची नावे आता समोर येत आहेत; ज्यामध्ये प्रशांत चंदने, जिजा गोविंद केंबरे, भूषण घोरपडे, अनंत पवार, दीपक गवळी आणि गणपत जेतू मदे यांचा दुर्दैवी अंत झाला आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा समावेश आहे. तसेच, मुरबाड येथे सर्कल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले महसूल अधिकारी भूषण घोरपडे यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे.अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम स्थानिकांनी अत्यंत जड अंतःकरणाने केले. टिटवाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतांचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर केला नसला तरी, ही संख्या वाढण्याचीभीतीव्यक्त होत आहे.हा अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाचा ताबा सुटला की वेगाचा अतिरेक नडला? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. टिटवाळा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला होता. एका गंभीर जखमी प्रवाशावर स्थानिक रुग्णालयातउपचारसुरू आहेत.

## इराण युद्धावरून आता ट्रम्प आणि पोप आमने-सामने !

वॉशिंग्टन/व्हॅटिकन सिटी : अमेरिका आणि इराणमधील युद्धविरामाची चर्चा फिस्कटल्यानंतर पुन्हा एकदा संपूर्ण जगातील तणाव वाढला आहे. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण युद्धाचे वर्णन 'ईश्र्वरी संमती लाभलेले' असे केले; परंतु पोप यांनी मात्र 'ईश्र्वर कोणत्याही संघर्षाला आशीर्वाद देत नाही,' असा ठाम पवित्रा घेतला. यानंतर आता ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पोप यांनाच प्रत्युत्तर दिल्याचे मानले जात आहे. यामुळे राष्ट्राध्यक्षांची सत्ता आणि पोप यांचा नैतिक अधिकार यांच्यात एक संघर्ष निर्माण झाला आहे.

ट्रम्प यांच्या मते, इराण युद्धासाठी देवाने त्यांची निवड केली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले होते की, माझा असा विश्र्वास आहे की इराणविरुद्धच्या युद्धात देव अमेरिकेच्या बाजूने आहे. यानंतर त्यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोपची खिल्ली उडवली. इतकेच नाही तर, पोपला इराणकडे अण्वस्त्रे असावीत असे वाटते, असा दावाही ट्रम्प यांनी केला.

ख्रिश्र्चन धर्मातील (रोमन कॅथोलिक चर्चचे) सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांनी म्हटले होते की, रक्ताने माखलेल्या हातांनी केलेली प्रार्थना देव ऐकत नाही. तसेच ट्रम्प यांनी त्यांना एक कमकुवत नेता आणि अति-उदारमतवादी व्यक्ती असेही म्हटले होते. तसेच ट्रम्प यांनी पोपला इराणकडे अण्वस्त्रे असावीत असे वाटते, हे आरोपही व्हॅटिकन आणि पोप यांनी फेटाळून लावले आहेत. पोप यांचा युद्धाला सातत्याने तीव्र विरोध आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून इराणच्या जनतेला देण्यात आलेल्या धमक्यांना त्यांनी पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे म्हटले आहे. 'पाम संडे'च्या प्रवचनात त्यांनी स्पष्ट केले की, जे युद्ध करतात त्यांच्या प्रार्थना देव ऐकत नाही, तर त्या फेटाळून लावतो.

पोप यांनी त्यांच्या ईस्टर संदेशात शस्त्रे खाली ठेवण्याचे आवाहन केले होते. इराणी सभ्यता नष्ट करण्याची ट्रम्प यांनी धमकी दिल्यानंतर त्यांनी हे आवाहन केले होते. व्हॅटिकनचे अमेरिकेतील प्रतिनिधी कार्डिनल क्रिस्टोफ पियरे यांना पेंटागॉनमध्ये पाचारण करण्यात आले. एका रिपोर्टनुसार, संरक्षण उपसचिव एलब्रिज कोल्बी यांनी कार्डिनलना सांगितले की, अमेरिकेकडे लष्करी ताकद आहे आणि कॅथोलिक चर्चने अमेरिकेचीच बाजू घेतलेली बरी.

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले अनंतात विलीन

मुंबई : ज्येष्ठ पार्श्र्वगायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दादर येथील कै.भागोजी कीर हिंदू स्मशानभूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.





दिवंगत आशा भोसले यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, मंत्री ड.आशिष शेलार, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री भरतशेठ गोगावले, मंत्री संजय शिरसाट, मुंबई महानगरपालिका महापौर रितू तावडे, खासदार अनिल देसाई, आमदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार महेश सावंत, मुंबई महानगर पालिका उपमहापौर संजय घाडी, मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्र्विनी भिडे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, कलावंत, चाहते तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी अखेरचे दर्शन घेत पुष्पचक्र वाहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तत्पूर्वी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून पाठविण्यात आलेले पुष्पचक्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत आशा भोसले यांच्या पार्थिवावर अर्पण केले.

सोमवारी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत दिवंगत आशा भोसले यांचे पार्थिव त्यांच्या राहत्या घरी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मंत्री मंगलप्रभात लोढा, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रणिती शिंदे, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार अरविंद सावंत, आमदार आदित्य ठाकरे, आमदार भाई जगताप, आमदार सुनील शिंदे, आमदार मिलिंद नार्वेकर विविध क्षेत्रातील मान्यवर, कलावंत तसेच चाहत्यांनी त्यांचे अखेरचे दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली.

## महाराष्ट्राची ऊर्जा क्षमता वाढणार

### पहिल्या कोळसा रेल्वे रॅकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई दि. १३ एप्रिल** : राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने सोमवारी एक ऐतिहासिक पाऊल पडले असून, छत्तीसगडमधील महानिर्मितीच्या मालकीच्या 'गारे पालमा' खाणीतून कोळशाची पहिली रेल्वे रॅक कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पहिल्या कोळसा रॅकचे उत्साहात स्वागत केले. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राला मोठी उभारी मिळणार असून, विदर्भाला राज्याचे 'ऊर्जा केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या स्वप्नाला बळ मिळाले आहे.

छत्तीसगड येथील गारे पालमा सेक्टर-२ या कोळसा खाणीतून आलेल्या या पहिल्या रेल्वे रॅकचे आगमन ऊर्जा स्वावलंबनाच्या प्रवासातील निर्णायक टप्पा मानला जात आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कोळसा हाताळणी प्रकल्पाची पाहणी करून उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

या खाणीचे महत्त्व विशद करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गारे पालमा या खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत आहे. या उच्च गुणवत्तेमुळे वीजनिर्मितीची क्षमता तर वाढणारच आहे, शिवाय ऊर्जेसाठी लागणाऱ्या कोळशाचे प्रमाणही पूर्वीपेक्षा कमी होणार आहे. पुढील ७७ वर्षे राज्याला या खाणीतून उच्च दर्जाचा कोळसा मिळत राहणार आहे. यामुळे भविष्यातील वीज तुटवड्याचा धोका कायमचा टळणार असून हे दीर्घकालीन शाश्र्वत विकासासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



# जमीन पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पाचा केळी तांडा येथून प्रारंभ

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, 13 एप्रिल** | राज्यातील जमिनीचे नकाशे आणि सातबारा यामधील तफावत दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजना 2024-25 अंतर्गत महत्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. या अंतर्गत जमिनीची पोटहिस्सा मोजणी व नकाशे अद्ययावत करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्याची पहिल्या टप्प्यात निवड करण्यात आली असून, मौजे केळीतांडा येथे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय भूमापन दिनाच्या निमित्ताने प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख प्रशांत बिलोलीकर, औंढा नागनाथचे उपअधीक्षक भूमी अभिलेख नितीन गुरव, कर्मचारी प्रदीप महालनकर, सचिन आहेर, प्रदीप प्रधान, तलाठी नितीन अंभोरे, नवनाथ गोडसे, ग्रामसेवक श्री. एम. सी. घनसावंत तसेच रामटेक सॉफ्टवेअर सोल्युशन प्रा. लि. या संस्थेचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.



जमीन पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पामुळे सातबारा व नकाशातील विसंगती दूर होऊन जमिनीचे व्यवहार अधिक पारदर्शक होणार आहेत. पोटहिस्सा मोजणीमुळे सीमावाद कमी होऊन अचूक डिजिटल नकाशे उपलब्ध होणार असून, त्यामुळे शेतकरी किंवा पोटहिस्साधारकांमधील वाद थांबतील. भूभाग नकाशे व अधिकार अभिलेख यांचे संलग्नीकरण शक्य होईल. पीक विमा व बँकिंग प्रक्रियेसाठी अद्ययावत डेटाबेस उपलब्ध होईल. खरेदीपूर्व मोजणी प्रक्रियेसाठी अचूक डिजिटल माहिती प्रणाली विकसित होणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी या प्रकल्पात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील केळीतांडा येथे पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पांतर्गत शेतजमिनीच्या प्रत्यक्ष मोजणी कामास शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन गट क्रमांक 11 मधील सुरू असलेल्या मोजणीची व नकाशांची पाहणी केली. तसेच सर्व खातेदारांनी या प्रकल्पाचा लाभ घेऊन मोजणीस सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी केले.

कार्यक्रमात जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख प्रशांत बिलोलीकर यांनी प्रास्ताविक करत पोटहिस्सा मोजणीचे महत्त्व स्पष्ट केले. हा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अपहृत मुलीची बिडकीन पोलिसांनी झारखंडमधून केली सुटका

तभा वृत्तसेवा

**बिडकीन** | एप्रिल बिडकीन येथून अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीची तब्बल चारशे किलो मीटरचा थरारक प्रवास करून झारखंड राज्यातून सुखरूप सुटका करण्यात बिडकीन पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी झारखंडमधील आरोपीला अटक केली असून, न्यायालयाने आरोपीची हसूल कारागृहात रवानगी केली आहे. दि २० मार्चला सकाळी मुलीचे अपहरण झाले होते. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अपर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक नीलेश शेळके यांनी विशेष तपास पथक नियुक्त केले. तांत्रिक विश्लेषणाद्वारे मुलगी झारखंडमध्ये असल्याचे निष्पन्न झाले.रेल्वे प्रवासातील विलंब टाळण्यासाठी तपास पथकातील गणेश खंडागळे व सचिन आगलावे यांनी खासगी वाहनाने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहार असा पाच राज्यांचा प्रवास करत झारखंड गाठले. दि ३० मार्चला मध्यरात्री स्थानिक पोलिसांच्या मदतीने अत्यंत दुर्गम भागात छापा टाकून मुलीची सुटका केली व आरोपी विकास रविदास (वय २१) याला ताब्यात घेतले कोडरमा न्यायालयातून ७२ तासांचा ट्रांझिट रिमांड घेऊन आरोपीला महाराष्ट्रात आणले.व पैठण सत्र न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर त्याची हसूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. मुलीच्या नातेवाईकांनी बिडकीन पोलिसांचे आभार मानले

## पैठणला काँग्रेस तर्फे संघटन सृजन अभियान बैठकीचे आयोजन

पैठण दि १२ :- इंदिरा काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात ठिकठिकाणी तालुका निहाय संघटन सृजन अभियान अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १३ एप्रिल सोमवार रोजी सकाळी १० वाजता आशीर्वाद मंगल कार्यालय येथे पैठण काँग्रेसची बैठक पार पडणार आहे. या बैठकीला प्रदेश काँग्रेसचे प्रभारी विवेक बंसल खासदार डॉ. कल्याण काळे, माजी मंत्री अनिल पटेल, प्रदेश वरिष्ठ प्रवक्ता अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस धनंजय चौधरी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. पैठण शहरासह तालुक्यातील तमाम काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते, सदस्य यांनी वरील बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पैठण शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा गटनेते हस्नोद्दीन कट्यारे,तालुकाध्यक्ष रमेश मुळे यांनी केले आहे.

## पाळीव प्राण्यांच्या प्रेमात रंगले झी टीव्हीचे कलाकार

छत्रपती संभाजीनगर: राष्ट्रीय पाळीव प्राणी दिनानिमित्त प्राणी आणि मानवातील अतूट नात्याचा संदेश झी टीव्हीवरील प्रसिद्ध कलाकारांनी दिला आहे. मालिकांमधील कलाकारांनी आपल्या लाडक्या पाळीव प्राण्यांबद्दलच्या भावना व्यक्त करत हा दिवस उत्साहात साजरा केला. वसुधा मालिकेतील अभिषेक शर्मा यांनी आपली मांजर तारा हिच्यामुळे तणाव दूर होत असल्याचे सांगितले. गंगा माई की बेटियाँ मधील अमनदीप सिधू यांनी प्राणी घरात सकारात्मकता आणि उबदारपणा आणतात असे नमूद करत प्राणी दत्तक घेण्याचे आवाहन केले. लक्ष्मी निवास मधील अक्षिता मुदगल यांनी कुत्र्यांशी असलेले आपले नाते शब्दांच्या पलीकडचे असल्याचे स्पष्ट केले. पाळीव प्राणी हे केवळ सोबती नसून कुटुंबाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या निःस्वार्थ प्रेमामुळे मानवी जीवनात आनंद आणि शांतता मिळते. प्राण्यांप्रती प्रेम आणि जबाबदारी जपण्याचा संदेश या कलाकारांनी यावेळी दिला.

## रमेश चौधरी यांच्या शैलीतून उलगडणार 'सालबर्डी' चा थरार

छत्रपती संभाजीनगर – चित्रपट ही केवळ कथा नसते ती एक भावनांची, दृश्यांची आणि विचारांची गुंफण असते. या गुंफणीत प्रत्येक धागा योग्य ठिकाणी बांधण्याचं कौशल्य दिग्दर्शकाकडे असतं. म्हणूनच चित्रपटाच्या यशाचं खरं सूत्र दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनात आणि मांडणीत दडलेलं असतं. सक्षम निर्मितीमूल्यांची जोड मिळाली, की ही कलाकृती प्रेक्षकांच्या मनात घर करून जाते. अशाच वेगळ्या वाटेवर चालणारे, आशयघन आणि प्रभावी चित्रपटांसाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक रमेश साहेबराव चौधरी आता प्रेक्षकांसाठी एक नवा, थरारक अनुभव घेऊन येत आहेत 'सालबर्डी'. सामाजिक आणि वास्तववादी विषयांवर ठसा उमटवणाऱ्या चौधरी यांनी यावेळी रहस्य आणि थरार यांची सांगड घालत एक उत्कंठावर्धक कथा पडद्यावर साकारली आहे. निर्माते अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांची भक्कम साथ लाभलेला हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारला असून, येत्या १७ एप्रिलला प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

## ९५% एलपीजी बुकिंग ऑनलाइन

छत्रपती संभाजीनगर - देशभरातील एलपीजी पुरवठा स्थिर आणि पुरेसा असल्याची खात्रीशीर माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाद्वारे नागरिकांना देण्यात आली आहे. ग्राहकांनी भीतीपोटी इंधनाचा साठा करणे टाळावे आणि जबाबदारीने इंधनाचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. देशभरातील ग्राहकांना विनाअडथळा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी एलपीजीच्या उपलब्धतेवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. तसेच त्यासाठी लागणारे योग्य ते व्यवस्थापन केले जात असल्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाद्वारे अधोरेखित करण्यात आले आहे.

## एआय प्लस स्मार्टफोन नोवा 2 आता १४ एप्रिलपासून फ्लिपकार्टवर उपलब्ध

छत्रपति संभाजीनगर - एआय प्लस स्मार्टफोनतर्फे त्यांच्या नव्याने सादर झालेल्या नोवा सीरिजचा भाग असलेल्या नव्या नोवा 2 फोनच्या विक्रीला सुरुवात होत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. दैनंदिन जीवनातील विश्वासार्हता आणि वैयक्तिक स्टाइलचे प्रतिबिंब असणारी स्टाईल यांच्या संगमातून डिझाइन करण्यात आलेला नोवा 2 खास फक्त फ्लिपकार्ट आणि काही निवडक रिटेल आऊटलेटमध्ये १४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजल्यापासून विक्रीसाठी उपलब्ध असेल. "सर्वांसाठी उपलब्ध, विश्वासार्ह आणि दैनंदिन वापरासाठी तयार करण्यात आलेले तंत्रज्ञान अशी ओळख असलेल्या एआय प्लस ची आजवरची सर्वात ठळक आणि दमदार अभिव्यक्ती म्हणजे नोवा सीरिज.

## यू.एस. पोलो असोसिएशनचा नव्या फ्लॅगशिप स्टोअरसह विस्तार

**पुणे** | यू.एस. पोलो असोसिएशन, भारतातील अग्रगण्य कॅज्युअलवेअर ब्रँड आणि युनायटेड स्टेट्स पोलो असोसिएशनचा (USPA) अधिकृत ब्रँड, महाराष्ट्रातील आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. शहरातील सर्वात प्रतिष्ठित आणि दीर्घकाळ चालणाऱ्या रिटेल ठिकाणांपैकी एक असलेल्या पुण्यातील जेएम रोडवर ८ एप्रिल २०२६ रोजी आपल्या नव्या फ्लॅगशिप स्टोअरचे भव्य उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी, अभिनेता आणि युवा आयकॉन सनी कौशल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून सायंकाळच्या कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्यांच्या उपस्थितीने भारतातील तरुण, स्टाईल-सजग ग्राहकांमध्ये ब्रँडचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी सूत्रसंचालकाच्या नेतृत्वाखालील अनेक मजेदार खेळ आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद साधून अतिथींशी संवाद साधला, ज्यामुळे स्टोअरमध्ये एक आकर्षक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले. त्यांनी रिबन कापून अधिकृत उद्घाटन केले आणि त्यानंतर चाहत्यांशी आपुलकीने संवाद साधला.

## शालिवाहन पतसंस्थेची 322 कोटी व्यवसायाची भरारी

तभा वृत्तसेवा

पैठण दि १३ :- येथील शालिवाहन पतसंस्थेने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करतांना ३१ मार्च २०२६ अखेर ३२२ कोटी व्यवसायाचा टप्पा पार करत २ कोटी ११ लाख रुपये निव्वळ नफा मिळवला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांनी दिली.

"सहकारातून समृद्धीकडे" या तत्त्वानुसार २९ वर्षांच्या यशस्वी प्रवासात पैठण येथील मुख्य कार्यालय व १३ शाखांच्या माध्यमातून २०२५-२६ या आर्थिक वर्षात ३२२ कोटी व्यवसायाचा टप्पा पार करतांना एका आर्थिक वर्षात २२ टक्क्यांनी व्यवसाय वाढ केली. २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेचा शुन्य टक्के एन.पी.ए. सोबत ९९% कर्ज वसुली, १८०.८० कोटीच्या ठेवी, १४१.४० कोटीचे कर्ज वाटप, एकूण गुंतवणूक ६१.३६ कोटी, रोख तरलता निधी २.२६%, एकूण गुंतवणूक तरलता निधी ३३.९२%, संस्थेचे भागभांडवल ७.५२ कोटी, राखीव व इतर निधी १५.११ कोटी सोबत संस्थेने २ कोटी ११ लाख रुपये निव्वळ नफा मिळविला आहे.



संस्थेचा पारदर्शक आर्थिक व्यवहार, सभासद व ग्राहकांचा विश्वास, समर्पित भावनेने काम करणारे उच्चशिक्षित संचालक मंडळाचे मजबूत व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांची भक्कम साथ आणि फक्त नि फक्त सभासद व ग्राहकांचे हित या आधारे बँकिंगची उत्कृष्ठ परंपरा आणि विश्वासाला विकासाचा मजबूत आधार देत सहकार भारतीच्या तत्त्वावर वाटचाल करत संस्थेने महाराष्ट्रभर उतुंग भरारी घेतली आहे.

शालिवाहन पतसंस्थेला सर्वोत्कृष्ठ बँकिंग सोबत समाजोपयोगी सेवा दिल्याबद्दल, "बँको ब्लु रिबन", "राष्ट्रीय सन्मान पुरस्कार","दीपस्तंभ","गोदावरी पुरस्कार २०२५", "व्यापारी अग्रणी पुरस्कार", बेस्ट चेअरमन पुरस्कार, बेस्ट सि.ई.ओ. पुरस्कार, "मराठवाडा गौरव २०२६" या सारख्या राज्य पातळीवरील विविध पुरस्कारांनी सन्मानित करणात आले आहे. ग्राहकांची आर्थिक फसवणूक होवू नये म्हणून संस्थेच्या वतीने "ग्राहक साक्षरता अभियान" राबविण्यात येत असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन किशोर चौहान, व्हाईस चेअरमन डॉ.जयंत जोशी, मानद सचिव प्रकाश कासलीवाल यांनी दिली.

## शासनाचा व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल युवा भारुडकार शेखर भाकरे यांचा सत्कार



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१३ एप्रिल** | रहिमाबाद येथील भारुडरत्न कै.निरंजन जी भाकरे यांचे चिरंजीव युवा भारुडकार शेखर निरंजन भाकरे यांना महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा नुकताच राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल सोयगाव नाट्य पंढरी येथे दि.१२ रविवार रोजी समाज प्रबोधनकार विष्णू विनायकराव मापारी सोयगावकर यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली असता त्यांचा समाज प्रबोधनकरांच्या व सोयगावकरांच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर जी सोहनी व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र काळे,नगरसेविका संध्याताई मापारी यांच्या हस्ते त्यांचा शाल,श्रीफळ,पुष्पहार देऊन उत्साहात सत्कार करण्यात आला.यावेळी शेखर भाकरे यांच्या मातोश्री यांचा पण सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास जगदाळे सर, आरोग्य दूत दिगंबर वाघ,सुधाकर सोहनी यांचेसह गावकरी, युवक कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी शेखर भाकरे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगून सर्वांनी व्यसनमुक्त जीवन जगावे अशी अपेक्षा व्यक्त केली. मापारी तुमचा सोयगावकरांचा कायम मला आशीर्वाद असू द्या अशी अपेक्षा व्यक्त केली.शेवटी समाजप्रबोधनकार विष्णू मापारी यांनी सर्वांचे आभार मानले.

## विश्वशांतीसाठी 1561 कोटी नवकार महामंत्रांचा जप; छत्रपती संभाजीनगरमध्ये संकल्पपूर्ती

**छत्रपती संभाजीनगर** | भगवान महावीर यांच्या २६२५ व्या जन्मकल्याणक महोत्सवाचे औचित्य साधून नवकार फाउंडेशनच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या जागतिक नवकार जप अभियानात तब्बल १५६१ कोटी नवकार महामंत्रांचा जप पूर्ण झाला आहे. गच्छाधिपती अभयदेव सुरीश्वरजी महाराजांच्या प्रेरणेने आणि आचार्य मोक्षरत्नसुरीश्वरजींच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान यशस्वी झाले असून यात जगभरातील १० लाख कुटुंबे व ५० हजार साधू-साध्वींनी सहभाग घेतला, अशी माहिती प्रकल्प प्रमुख रवींद्र मुगदिया यांनी दिली. या अभियानात अभय मांगलिक मंडळाने सर्वाधिक १००८ कोटी, तर कोटा संप्रदायाने श्रुत मुनीजी व गौरव मुनीजींच्या मार्गदर्शनाखाली आणि आचार्य आनंद ऋषीजी महाराज पुण्यतिथीनिमित्त भाविकांनी प्रवीण ऋषीजींच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येकी २०७ कोटी जप पूर्ण केले. या मोहिमेत भारतसह १०८ देशांमधील भाविकांचा सहभाग होता. सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दर्डा, कार्याध्यक्ष सुभाष झांबड, महावीर पाटणी, जी. एम. बोथरा तसेच महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रतीक शाहूजी व अजय जैन यांच्या नेतृत्वाखाली हे कार्य संपन्न झाले.

या प्रसंगी ७७,००० पक्षी जलप्याऊ (पात्रांचे) वाटप संपूर्ण भारतात करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी विलास साहुजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, अनिलमामा संचेती, डॉ. प्रकाश झांबड, हितेश कांकारिया, प्रकाश कोचेटा, रवी लोढा, निलेश जैन, अजित जैन, अभिजीत हिरप, अमित काला, राजेश मुथा, समीर ठोले, संतोष पापडीवाल, पियूष कासलीवाल आणि विकास रायमाने यांनी परिश्रम घेतले.

या उपक्रमाला आचार्य डॉ. शिवमुनीजी, आचार्य महाश्रमणजी, गणाचार्य पुष्पदंत सागरजी, प्रतिभा कवरजी, सिद्धी सुधाजी आणि डॉ. पुण्यशिलाजी म.सा. यांचे आशीर्वाद लाभले.

## श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त सामुदायिक श्री गुरुचरित्र ग्रंथाचे पारायण



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१३: श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी सप्ताह निमित्त, श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा केंद्र गंगापूर येथे सामुदायिक श्री गुरुचरित्र ग्रंथाचे पारायण आयोजित करण्यात आले आहे.

एकूण १०८ सेवेकरी या पारायण सेवेत सहभागी झालेले आहे. यात महिलांची संख्या अधिक प्रमाणात असल्याचे दिसून आले. यात महिला सेवकरी ७२ इतर सर्व पुरुष सेवेकरी आहेत.

मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक बांधिलकी म्हणून, राष्ट्र हितासाठी हवनयुक्त सामुदायिक "प्रत्यंगिरा चंडी पाठाचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. या सेवेत देखील मोठ्या संखेने सेवेकरी उपस्थित राहण्याचे आवाहन गंगापूर सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. यंदाचे केंद्राचे हे ४१ वे वर्ष आहे.

यावेळी, जिल्हा प्रतिनिधी झुंजारराव काकडे, तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान सर व सुधाकर सपकाळ सर कर सल्लागार शांतीलाल जाधव, सुनीता शर्मा, सिंदूबाई पाटील, सायली धुमाळ, आदी अनेक सेवेकरी यांची उपस्थिती होती.

## 36 मीटर उंचीच्या अत्याधुनिक मल्टी आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर प्राप्त; अग्निशमन सेवेत मोठी झेप - पालकमंत्री यांचा पुढाकार

**छत्रपती संभाजीनगर** | शहरातील वाढत्या बहुमजली इमारतींच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम व आधुनिक करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त निधीतून 36 मीटर उंचीच्या अत्याधुनिक मल्टी आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर सेट मशीनरीची खरेदी करण्यात आली आहे.




महानगरपालिकेकडे यापूर्वी बहुमजली इमारतींमध्ये आग लागल्यास प्रभावीपणे नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक आधुनिक यंत्रणा उपलब्ध नव्हती. ही गरज ओळखून पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या पुढाकाराने जिल्हा नियोजन समितीमार्फत सुमारे रु. 15.78 कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त मल्टी आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर सेट खरेदी करण्यात आला आहे.

या संचामध्ये 36 मीटर उंचीचा वॉटर टॉवर, 14,000 लिटर क्षमतेचा वॉटर बाउजर आणि अग्निशमनासाठी उपयोगी रोबोटचा समावेश आहे. ही यंत्रणा जर्मन तंत्रज्ञानावर आधारित असून "स्विंग" या नामांकित जर्मन कंपनीची आहे. भारतातील अधिकृत प्रतिनिधी मे. निधी एंटरप्रायझेस, मुंबई यांच्या मार्फत या मशीनरीचा पुरवठा करण्यात आला आहे.

ही अत्याधुनिक यंत्रणा 10 ते 12 मजली इमारतींमध्ये लागलेल्या आगीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यास सक्षम ठरणार आहे. वॉटर टॉवरच्या बूमवर बसविण्यात आलेल्या मॉनिटरिंग कॅमेरा व फायबर ऑप्टिक प्रणालीद्वारे आगीचे अचूक निरीक्षण करता येते. तसेच थर्मल कॅमेऱ्याच्या सहाय्याने वाहनाच्या कंट्रोल पॅनेलमधून ऑपरेटरला तळमजल्यापासूनच आगीवर नियंत्रण मिळविता येणार असून, यामुळे अग्निशमन कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष आगीजवळ जाण्याचा धोका टाळता येणार आहे.

यंत्रणेमध्ये असलेल्या रोबोटच्या साहाय्याने आग विझविण्याचे काम अधिक सुरक्षित आणि जलदगतीने पार पाडता येणार आहे. बाउजरद्वारे सतत पाणीपुरवठा सुनिश्चित केला जात असल्याने आग विझविण्याची कार्यक्षमता अधिक वाढणार आहे.

सदरची यंत्रणा नुकतीच महानगरपालिकेला प्राप्त झाली असून, लोकार्पणानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण दिल्यानंतर या मशीनरीचा प्रत्यक्ष वापर सुरू करण्यात येणार आहे. या नव्या यंत्रणेच्या समावेशामुळे शहरातील अग्निशमन सेवा अधिक सक्षम, सुरक्षित आणि परिणामकारक होणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी वेद पाठशाळेच्या निर्माणास सढळ हाताने सहकार्य करा- स्वामी गोविंददेव गिरी महाराज
## आडगाव जिल्हा संभाजीनगर येथे केशव माधव चतुर्वेद पाठशाळेच्या बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, १३ एप्रिल २०२६** | दयानंद सेवा आश्रम, आडगांव (बु.), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे केशव-माधव चतुर्वेद पाठशाळेच्या प्रस्तावित छात्रावासाचा भूमिपूजन समारंभ सोमवार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष व श्रीक्षेत्र कृष्ण जन्मभूमी चे उपाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उद्योगपती श्री.रामचंद्र भोगले सौ. शामल भोगले,



आमदार मा. ना. अनुराधाताई चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्य अभियंता अतुलजी चव्हाण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देवगिरी प्रांत संघचालक मा.अनिलजी भालेराव अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मुकुंदराव खोचे सत्यनारायण जाजू, जगदीश सारडा, पद्मा तापडिया पल्लोड विजय महाराज लक्ष्मण माने सौ अंजू माने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पूज्य स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी वेद-विद्येच्या प्रचार-प्रसारासाठी हिंदू संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी अशा प्रकारच्या वेदपाठ शाळांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. तसेच ते पुढे म्हणाले केशव माधव चतुर्वेद पाठशाळेच्या इमारतीच्या निर्माणास आर्थिक सहयोग करावा आणि या वेद पाठशाळेतील विद्यार्थ्यांचे पालकत्व घ्यावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्व हिंदू परिषद मंदिर आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी केले या कार्यक्रमाला अखिल भारतीय पुरोहित पुरोहित महासंघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष पंडित विनायक महाराज फुलंब्रीकर, विभागीय कार्याध्यक्ष पद्मनाभ चौधरी व वेदपाठशाळा संचालक महेश पूर्णपात्रे, उदय कहाळेकर, शिवाजी दहिवाळ प्रदीप देशमुख पद्मनाभ चौधरी ज्ञानेश्वर जाधव चंद्रकांत पाटील यांनी परिश्रम घेतले.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ७१/२०२६

अर्जदार: १ विजय बाबुराव रावणे, वय ४६ वर्षे धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २ अजय बाबुराव रावणे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. शोभाबाई बाबुराव रावणे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

वारस सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत बाबुराव माधव रावणे हे दि. ०५/०९/२०२५ रोजी रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत बाबुराव माधव रावणे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - ०८/०५/२०२६.

आज दि. १३/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बहुरंगी फुले'चा थाटात प्रकाशन सोहळा; साहित्यप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती

सेलू,/प्रतिनिधी- के. बा. विद्यालयाच्या सभागृहात रविवार (दि. १२) रोजी साहित्यिक शेषराव कौसडीकर लिखित 'बहुरंगी फुले' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विनायकराव कोठेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य शरद कुलकर्णी, डॉ. आनंद देशपांडे व गोविंद जोशी उपस्थित होते. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेल्या लेखक शेषराव कौसडीकर यांनी ९० वर्षांहून अधिक आयुष्याचा समृद्ध अनुभव आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडला आहे. मराठवाडी बोलीभाषेतील मिश्किल, संवादप्रधान आणि प्रवाही शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य ठरले आहे. मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण, स्वतःच्या स्वभावाचे विनोदी विडंबन आणि मध्यमवर्गीय जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण यामुळे 'बहुरंगी फुले' हे पुस्तक वाचकांना आपलेसे करणारे ठरत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पुस्तक व लेखकाचे भरभरून कौतुक करत या साहित्यकृतीला व्यापक प्रसिद्धी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

पालखीतून पुस्तकांची आगमनयात्रा... आकर्षणाचा केंद्रबिंदू

प्रकाशन सोहळ्याला पारंपरिक रंग चढवित पुस्तके पालखीतून सभागृहात आणण्यात आली. या अनोख्या उपक्रमामुळे उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले गेले. ''पुस्तके केवळ प्रकाशनापुरती मर्यादित न राहता ती जगभर पोहोचली पाहिजेत,'' असा संदेश यावेळी देण्यात आला.



गुणवंतांचा सत्कार....

याप्रसंगी राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल विलास कौसडीकर तसेच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. डॉ. अमित कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्य...

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैष्णवी कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन जयश्री सोन्नेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप कौसळीकर यांनी केले.

या कार्यक्रमाला महेश चौधरी, ॲड. उमेश खारकर, प्रसाद खारकर, प्रा. संजय पिंपळगावकर, अनंत चौधरी, हेमंतकुमार पत्की, किरण कौसडीकर, प्रदीप कौसडीकर, शाम धारासुरकर, गंगाधर कान्हेकर, बंडोपंत रोशनगावकर, श्रीनिवास पांडे, शिवाजीराव टाकळीकर, अनंत चौधरी यांच्यासह शहरातील महिला व पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. साहित्य, परंपरा आणि उत्सव यांचा सुंदर संगम असलेला हा सोहळा सेलूच्या सांस्कृतिक जीवनातील एक लक्षवेधी घटना.

## संक्षिप्त वृत्त...

### पाणी तक्रारींवर मनपाची तात्काळ कारवाई
### जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळेत नमुने सादर

**परभणी,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या हद्दीत काही भागांमध्ये स्वच्छ पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी नगरसेवकांनी केल्यानंतर महानगरपालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेत कारवाई केली.

या तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग प्रमुख तनवीर बेग यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अभियंता बालाजी सोनुले, हेमंत दापटीकर, उपअभियंता शेख इस्माईल, सहाय्यक अभियंता अभिजीत कुलकर्णी, सुधाकरराव देशमुख व बाळासाहेब जगताप यांच्या पथकांनी संबंधित परिसरांना भेट दिली. पथकाने गोकुळ नगर, मथुरा नगर व यशवंत नगर या भागांतील विविध घरांमधून पाण्याचे नमुने गोळा करून ते जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळेत सादर केले. तसेच काही नमुन्यांची प्राथमिक तपासणी घटनास्थळीच करण्यात आली.

प्राथमिक तपासणीत पाण्यातील ओटी (ऑक्सिजन ट्रान्सफर/ट्रीटमेंट इंडिकेटर)चे प्रमाण योग्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. यावेळी संबंधित भागातील नगरसेवकांसोबत चर्चा करून त्यांच्या तक्रारींचे समाधान करण्यात आले. मनपाच्या या तत्पर कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, प्रशासनाने पुढील काळातही पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही तक्रार असल्यास तत्काळ कळविण्याचे आवाहन केले आहे.

### सामाजिक समता सप्ताहानिमित्त महापालिकेद्वारे विविध उपक्रम
### घरकुल लाभार्थ्यांना २३ वर्कऑर्डरचे वितरण

**परभणी,/प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्ष तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या वतीने सामाजिक समता सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत आज शुक्रवार १० एप्रिल रोजी पंतप्रधान आवास योजनेच्या २३ वर्कऑर्डरचे वितरण करण्यात आले. यासोबतच रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना पूर्णत्व प्रमाणपत्रेही देण्यात आली.

११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा फुले पुतळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सायंकाळी ५ वाजता नाट्य सादरीकरण होणार आहे. तसेच १३ एप्रिल २०२६ रोजी 'संविधान जागर - भारतीय संविधान' या विषयावर वकृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा सायंकाळी ४ वाजता बी. रघुनाथ सभागृह येथे पार पडणार आहे. यासोबतच वैद्यकीय आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने प्रभाग समिती 'ब' कार्यालय येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून मिरवणुकीच्या मार्गांवरील स्वच्छतेवरही विशेष भर दिला जाणार आहे. या सर्व उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, सभागृहनेते समी उर्फ माजुलाला व उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी केले आहे.

### महानगरपालिकेला जीएसटीचे ७३.७१ कोटी अनुदान मिळणार; समितीकडून तात्काळ मंजुरीची शिफारस
### आमदार डॉ. राहुल पाटील यांची माहिती

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेला जीएसटीचे थकीत ७३ कोटी ७१ लाख रुपये अनुदान लवकरच प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या संदर्भात मंत्रालयात गठीत समितीची बैठक पार पडून अनुदान तात्काळ देण्याबाबत शिफारस करण्यात आल्याची माहिती आमदार डॉ. राहुल पाटील यांनी दिली.

आ. डॉ. राहुल पाटील यांनी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १२ मार्च रोजी लक्षवेधी उपस्थित करून परभणी महानगरपालिकेच्या जीएसटी थकीत अनुदानाचा प्रश्न आक्रमकपणे मांडला होता. मनपाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यावर नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव कॅबिनेट बैठकीत मांडण्याचे आश्वासन दिले होते. यानंतर या विषयासाठी विशेष समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीची बैठक शुक्रवारी मंत्रालयात आमदार डॉ. पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीत परभणी महानगरपालिकेला जीएसटीचे ७३ कोटी ७१ लाख रुपये अनुदान देण्यास मंजुरीची शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे हे अनुदान लवकरच मिळणार असल्याचे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले.

या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या महानगरपालिकेला मोठा दिलासा मिळणार असून, शहरातील विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयाबद्दल महानगरपालिकेच्या वतीने आमदार डॉ. राहुल पाटील यांचे आभार मानण्यात आले.

### डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांना 'भीम रत्न पुरस्कार' जाहीर; महू येथे आज होणार सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी :** समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक न्याय या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांना प्रतिष्ठेचा 'भीम रत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटी (महू, मध्यप्रदेश) यांच्या वतीने १४ एप्रिल रोजी आयोजित भीम जयंती महोत्सवात मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती सोसायटीने दिली आहे.

डॉ. हत्तीअंबीरे यांचे कार्य बहुआयामी असून मागील २५ वर्षांपासून परभणी, ५ वर्षांपासून हिंगोली आणि ४ वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर येथे त्यांनी सामूहिक विवाह सोहळ्यांचे यशस्वी आयोजन केले आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३००० पेक्षा अधिक जोडप्यांचे विवाह पार पडले असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा आधार मिळाला आहे.

युवकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, परभणी व हिंगोली येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे सुरू करून हजारो युवक-युवतींना सरकारी सेवेत संधी उपलब्ध करून दिली आहे. शिक्षण क्षेत्रात परभणी येथे शाळा आणि वाळूज (छत्रपती संभाजीनगर) येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरू करून शिक्षणाच्या संधी निर्माण केल्या आहेत. तसेच परभणी व छत्रपती संभाजीनगर येथे मुलींसाठी वसतिगृहे चालवून त्यांनी शिक्षणाला बळ दिले आहे.सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात मागासवर्गीयांवर अन्याय-अत्याचार झाल्यास तत्काळ मदत व न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी छत्रपती संभाजीनगर येथे उजाड माळरानावर धम्मसंबोधी वनफ उभारून वृक्षलागवड तसेच पाणीसाठ्यासाठी बंधारा उभारण्याचे काम केले आहे. आरोग्य क्षेत्रात विविध रोगनिदान शिबिरे व मागील २५ वर्षांपासून रक्तदान शिबिरांद्वारे त्यांनी अनेक गरजू रुग्णांना जीवनदान

### घरावर निळा झेंडा आणि विद्युत रोषणाई करा-चव्हाण



**जिंतूर,/प्रतिनिधी-** दगड झालो तर दिक्षाभुमीचा होईल,माती झालो तर चैत्यभूमीचा होईल, हवा झालो तर भीमाकोरेगावची होईल,पाणी झालो तर चवदार तळ्याचे होईल,आणि जर पुन्हा मानव म्हणून जन्म मिळाला तर आई शपथ, फक्त आणि फक्त जय भीमवालाच होईल. संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगातील बहुतांश देशात साजरी होते.त्या अनुषंगाने यंदाची भिम जयंती साजरी करण्यासाठी प्रत्येक घरावर निळा झेंडा व विद्युत रोषणाई ही करावी असे आवाहन भिमसैनिक शरद चव्हाण यांनी केले आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपल्यासाठी सर्वात मोठा उत्सव आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे आपल्यासाठी सर्वकाही असून संविधान लेहुन मानसाला मानसाचे अधिकार मिळवून देणारे महामानव आहेत.तसा युगंधर या पृथ्वीतलावर जन्माला येणार नाही म्हणून परभणी जिल्ह्यातील व जिंतूर तालुक्यातील सर्व शहरात खेड्यापाड्यात बौद्ध वस्तीतील सर्व आंबेडकरी जनतेने एप्रिल महिन्यामध्ये आपल्या घरावर महीनाभर निळा झेंडा व विद्युत रोषणाई करुन महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती अतिशय आनंदात साजरी करावी असे आवाहन भिमसैनिक शरद चव्हाण यांनी केले आहे

### महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज पोलिसांचा बंदोबत

**परभणी,/प्रतिनिधी-** शहरासह जिल्हाभरात आज महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची१३५ वी जयंती मोठया उतसाहात साजरी करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आज संपूर्ण परभणी जिल्हयात पोलिसांच्यावतीने कडक असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हयातील संवेदनशील अशा ठिकाणी कडक असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. याशिवाय सायंकाळच्या सुमारास निघणाऱ्या मिरवणूकीमध्ये देखील पोलिसांची विशेष करुन महिलांची संरक्षणासाठी चोख असा बंदोबस्त केला आहे.

### वीज जोडणी राहिली कोसोदूर; ग्राहकास वीज वितरण कंपनीकडून ८६ हजार रुपयांचे बिल

**परभणी,/प्रतिनिधी :** नवीन वीज जोडणी करीता आवश्यक शुल्क भरुनसुध्दा वीज जोडणी तर राहिली दूरच परंतु, ग्राहकास सुमारे ८६ हजार रुपयांचे बिल देऊन हेतुतः मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देणाऱ्या वीज वितरण कंपनीस येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने ५० हजार रुपये नुकसान भरपाई व तक्रारीच्या खर्चापोटी ग्राहकास १० हजार रुपये देण्याचे आदेश बजावले आहेत.

सोनपेठ येथील लहुजी नगरातील आकाश ज्ञानोबा चव्हाण यांनी येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात १० सप्टेंबर २०२५ रोजी एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे, आपण वीज वितरण कंपनीकडे नोव्हेंबर २०२१ मध्ये दहिखेड (सोनपेठ) येथील नवीन घराकरीता वीज जोडणी मिळण्या संदर्भात रितसर अर्ज केला. जून २०२२ मध्ये कंपनीने आपणास ६३० रुपयांच्या रकमेची डिमांड नोट दिली. त्याप्रमाणे २९ सप्टेंबर २०२२ रोजी आपण सोनपेठ येथील भरणा केंद्रावर त्या निर्देशाप्रमाणे रक्कम अदा केली. तेव्हा एका आठवड्यात वीज जोडणी देऊ असे कंपनीतर्फे आश्वासन दिल्या गेले. परंतु, वीज जोडणी तर राहिली दूर या कंपनीने आपणास मीटर क्रमांक ०३९०४२१२४७६ अन्वये वीज देयके पाठविले. ऑगस्ट २०२२ पासून ऑगस्ट २०२५ पर्यंत आपण नियमितपणे वीज वापर केल्याचे दर्शवून ८६ हजार ७१२ रुपये १९ पैशाची वीज देयके हाती टिकवले. वीज वितरण कंपनीने काल्पनीक वापराचेच वीज देयक देऊन आपणास या पध्दतीने मानसिक व आर्थिक त्रास दिला. त्याचा परिणाम घराचे बांधकाम तर रखडलेच. परंतु, कंपनीच्या या मानसिक शारिरिक त्रासाने, छळवणूकीमुळे आपण हैराण झालो, असे म्हटले.

वीज वितरण कंपनीच्या या सेवेतील त्रुटी व अनुचित व्यापारी प्रथा असे घोषित करीत आपणास ५ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, तसेच जिल्हा ग्राहक वेलफेअर फंडमध्ये २ लाख रुपये जमा करावेत, तसेच तक्रारी पोटी ५० हजार रुपये द्यावेत, अशी या याचिकेद्वारे मागणी केली.

### सेलूची कु.स्वाती खंदारे यांची परभणी पोलीस पदी निवड

**सेलू,/प्रतिनिधी-** नुकत्याच लागलेल्या निकालांमध्ये गटकळ करिअर अकॅडमी ची विद्यार्थिनी कु.स्वाती बाबासाहेब खंदारे (रा. हातनूर तालुका सेलू जिल्हा परभणी) यांची परभणी पोलीस पदी(परभणी जिल्हा महीलांमधून प्रथम) निवड झाली. याबद्दल तिचा आईवडिलांसह अकॅडमी तर्फे व गवकर्यांतर्फे वाजत गाजत मिरणुक काढून, जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करत सत्कार करण्यात आला.

या वेळी तिच्या सोबतच अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेऊन पालघर पोलीस पदी निवड झालेली ममता थोरात,मुंबई लोहमार्ग पोलीस पदी निवड झालेली मोनाली जमधाडे आणि सुरेखा चव्हाण यांचाही सत्कार करण्यात आला.अतिशय प्रतिकूल परिस्थितीत चारही मैत्रिणीने एकाच वेळी हे



यश संपादन केल्यामुळे सेलू तालुक्यातील सर्व स्तरातून तिचे व गटकळ अकॅडमीचे कौतुक होत आहे.

या सत्कार सोहळा निमित्त अकॅडमीचे संचालक प्रा श्री रामेश्वर गटकळ सर , प्रा श्री दीपक गटकळ सर, गोपाळ ताठे,मैदानी प्रशिक्षक योगेश राठोड, हातनुर गावचे सरपंच श्री महेन्द्र गाडे, गोहेगावचे माजी सरपंच श्री दत्तापाटील गटकळ, पोलीस पाटील श्री बबन पारवे ,श्री जयसिंग शेळके तसेच युवा नेते शुभम खंदारे, सर्व परिवार,अकॅडमीतील सर्व स्टाफ तसेच विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिद्द, चिकाटी, मेहनत व त्याचबरोबर सातत्य टिकून ठेवलं तर तुम्ही यशाला नक्कीच गवसणी घालू शकता असं आपले मनोगत व्यक्त करताना स्वाती यांनी सांगितले.



**परभणी-महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी जिल्हा मा ना सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करण्यात आले, यावेळेस विनायकराव दाभाडे, विश्वनाथ राऊत, पांडुरंग माने, काशिनाथ राऊत आदी उपस्थित होते.**

### गंगाखेडच्या इतिहासात पहिल्यांदाच घडला अवयव दानाचा महासंकल्प; ४० ते ५० नागरिकांनी उचलले क्रांतीकारक पाऊल

**मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त संतोष टोले मित्र परिवार प्रेरणादायी उपक्रम**

**गंगाखेड ,/प्रतिनिधी:** शहरात अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, पण गंगाखेडच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असा एक अनोखा आणि अत्यंत प्रेरणादायी उपक्रम नुकताच पार पडला. निमित्त होते आमदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसाचे! या औचित्याने संतोष भाऊ टोले मित्र परीवारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तब्बल २६ नागरिकांनी एकत्रितपणे अवयव दानाचा संकल्प केला. विशेष म्हणजे, महाराष्ट्राच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवयव दानाचा संकल्प होण्याची ही

४० ते ५० दात्यांचा ऐतिहासिक संकल्प साधारणपणे अवयव दानासाठी एक किंवा दोन व्यक्ती पुढे येतात, मात्र यावेळी एकाच वेळी ४० ते ५० नागरिकांनी स्वतःहून पुढे येत मरणोत्तर अवयव दानाचा फॉर्म भरून समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ''मरणोत्तरही आपले अस्तित्व दुसऱ्याच्या रूपाने जिवंत राहावे,'' हा उदात्त विचार या उपक्रमातून घराघरांत पोहोचला आहे. रक्तदान शिबिराचाही मोठा प्रतिसाद अवयव दानासोबतच यावेळी भव्य रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील तरुण आणि नागरिकांनी उत्स्फ प्रमाणात रक्त संकलन केले. वाढदिवसाचे औचित्य साधून केवळ जल्लोष न करता खऱ्या अर्थाने समाजसेवा कशी करावी, याचे उत्तम उदाहरण संतोष भाऊ टोले मित्र परिवारने घालून दिले आहे. मान्यवरांची मांदियाळी या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून रबडदे मामा, व्यंकटराव तांदळे, बालासाहेब जी निरस, किशनराव भोसले, संदीप सानप, माधवराव थोरे, नामदेवराव शिंदे, प्रशांत फड, संतोष राव टोले, जयदेव मिसे, ओम प्रकाश जवळकर, श्रीनिवास फड, रमेश सुरवसे, शेळके, पराग तमेवार, अमोल सानप, श्वेता आचार्य, विलास मंगरूळकर, गोविंद डोने, सुमित कांबळे, रोहित कोकड, चिंतामण



खंडेलवाल, सचिन सूर्यवंशी, बाळू सूर्यवंशी, गणेश सूर्यवंशी यांची उपस्थिती लाभली. यावेळी संतोष भाऊ टोले मित्र परिवाराचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संख्येने उपस्थित होते.''हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नसून ती एक चळवळ आहे. मेघना दीदींच्या वाढदिवसाला दिलेली ही सर्वात मोठी आणि अनमोल मित्र परिवार गंगाखेडमधील हा ऐतिहासिक आणि समाजाभिमुख उपक्रम सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत असून, सोशल मीडियावर या उपक्रमाचे मोठे

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी कुठल्या तरी एका कार्यक्रमात सांगितलेला किस्सा. लतादीदी, मीनाताई या सगळ्या मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्यासमोर गात असायच्या त्यावेळी छोट्या आशा मंगेशकर खेळत-बागडत असायच्या. आईने एकदा दीनानाथांना सांगितले की, या मुली गातात, ही आशा मात्र गात नाही. त्यावर मास्टर दीनानाथ म्हणाले होते की, ती बंदिशी पाठ करीत नाही. गाणे शिकत नाही. पण, सर्व गोष्टींचा तिचा रियाज आतल्या आत सुरू आहे. एक दिवस असा येईल की, ती कुणालाच काहीही लक्षात न येता फार मोठी गायिका म्हणून प्रसिद्ध होईल!...आणि झाले अगदी तसेच. बालपणी खेळण्यात रमलेली, सुरुवातीला फारशी गंभीर न झालेली आशा जागतिक कीर्तीची गायिका बनली आणि तिने अनेक दशके स्वरसम्राज्ञीचे पद भूषविले. गजल, ठुमरी, लावणी, भावगीत, भजन, पॉप-रॅप असे सारे प्रयोग केले. आशा पारेख, मुमताज, साधना, मधुबाला, मीनाकुमारी, झीनत अमान, हेलन ते माधुरी दीक्षित-करिश्मा कपूर-काजोल आणि उर्मिला मातोंडकर यांच्यापर्यंत अनेकींना आशाताईंनी स्वर दिला. अशा आशाताईंचा श्वास रविवारी, १२ एप्रिल रोजी थांबला. हजारो गाणी आणि त्यातील त्यांचा सुरेल आवाज, आर्तता, मादकता, नाद आणि खट्याळपणा हे सारे त्यांनी रसिकांसाठी मागे सोडले आहे. प्रत्येक मानवी भावनेशी निगडित असलेले एक तरी गाणे आशाताईंनी गायिलेले आहे. नऊ दशकांच्या वळणदार आणि संघर्षमय जीवनात सात दशकांहून अधिक काळ संगीताशी नाते कायम ठेवलेल्या आशाताईंची गाणी हे भारतीय संगीतातील फार मोठे संचित आहे. आशाताई आता आपल्यात नसल्या तरी त्यांच्या सुरावटींच्या रूपाने त्या आपल्या साऱ्यांच्या काळजात सदैव अमर असतील. अमर सुरांच्या या सम्राज्ञीला आदरांजली.

आशा मंगेशकरांची आशा भोसले झाली कोवळ्या वयात. लहानग्या वयापासून घरातली सगळी कामे आणि पुढे मुलांची जबाबदारी. तरुण वयात जोडीदार सोडून गेला. एकीकडे घर आणि मुलांचा सांभाळ आणि दुसरीकडे जमेल तशी गायकी. स्वातंत्र्योत्तर काळाचे दशक उलटता-उलटता लतादीदी ख्यातकीर्त झालेल्या होत्या. गीता दत्त आणि शमशाद बेगम यांच्यासारख्या गायिकांचे चित्रपटसृष्टीवर अधिराज्य होते. हिंदी चित्रसृष्टीला बहर आला होता. आशा भोसले धडपडत होत्या. त्या गात होत्या, काही हिंदी-मराठी गाणी रेकॉर्ड पण झाली होती, त्यांच्या गाण्याला मान्यता मात्र मिळाली नव्हती. १९५७ मध्ये दिलीपकुमार आणि वैजयंतीमालाचा 'नया दौर' हा चित्रपट आला. साहिर लुधियानवीने लिहिलेल्या आणि ओ. पी. नय्यर यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांनी आशा भोसले हे नाव प्रकाशात आले. तत्पूर्वी सचिन देव बर्मन यांच्यासोबत त्या गायिल्या होत्या. त्यांचे चित्रपट चालले होते. पण आशा भोसले यांचे दमदार गायिका असे नाव झाले नव्हते. यश त्यांना हुलकावण्या देत होते. आशाताईंच्या जीवनात 'नया दौर'च्या निमित्ताने खरोखर नवे युग सुरू झाले. तेव्हापासून आशाताईंचे गाणे जे नव्या दमाने सुरू झाले, ते अखेरपर्यंत थांबले नाही. आशाताईंचा खरा प्रवास सुरू झाला तेव्हा लतादीदी प्रस्थापित झाल्या होत्या. घर आणि घराणे एकच. महावृक्षाच्या सावलीत स्वतःच्या गायकीच्या वृक्षाला बहर आणायचा हे आव्हानच होते. ते त्यांनी स्वीकारले. संकटे, संघर्ष, दगदग यांचे सावट कलेवर आणि साधनेवर पडू दिले नाही. त्या सतत गात राहिल्या. प्रयोग करीत राहिल्या. त्यांनी तब्बल बारा हजारावर गाणी गायिली. प्रामुख्याने ती हिंदी आणि मराठीतच असली तरी देशातल्या आणि जगातल्या एकूण २० भाषांमध्ये त्या गायिल्या. बंगाली, गुजराती, आसामी, भोजपुरी, पंजाबी, तमिळ, मल्याळम, तेलगू, नेपाळी आणि इंग्रजीतही त्या गायिल्या.

आर. डी. बर्मन यांच्याशी आशाताईंचे दुसरे लग्न झाले होते. आर. डी. उपाख्य पंचमदा आणि आशाताईंनी सिनेसृष्टीला अवीट गोडीची आणि विविध धाटणीची अनेक गाणी दिली. या जोडीने चित्रसृष्टीच्या संगीताचा चेहरामोहराच बदलून टाकला. काही वर्षांपूर्वी आशाताईंची एक मुलाखत झाली होती. त्यात त्या म्हणाल्या होत्या की, पंचमना (आर. डी. बर्मन) भेटेपर्यंत आपण इतक्या ताकदीने आणि विविधतेने गाऊ शकतो, याची मला कल्पनाच नव्हती. ओ. पी. नय्यर यांनी प्रस्थापित केलेल्या आशाताईंना एका धाटणीत न अडकवता वैविध्यात रमविले ते आर. डी. बर्मन यांनी. पुढे १९८१ मध्ये आलेल्या 'उमराव जान'मध्ये रेखा जितकी गाजली, तितकीच गाजली आशा भोसलेंची गायकी. शहरयार यांनी लिहिलेली गाणी, खय्यामचे संगीत आणि आशाताईंचा सूर यातून दिल चीज क्या है, इन आँखों की मस्ति के, जुस्तजू जिसकी थी अशा एकाहून एक सरस चीजा चित्रपट संगीताला मिळाल्या. आशाताईंच्या स्वरांत गाण्यातील भावनेच्या गरजेप्रमाणे खट्याळपणा असे आणि आर्तताही. गंमतही असे आणि गांभीर्यही. 'उडे जब जब जूल्फें तेरी' ते 'चैन से हमको कभी' ही त्यांची एकमेव 'रेंज नव्हे'. अशा कितीतरी 'रेंजेस' त्यांच्या हजारो गीतांतून काढता येतील. बंधू हृदयनाथ मंगेशकर, कवी सुरेश भट, सुधीर फडके, शांताराम नांदगावकर, जगदीश खेबुडकर, शांता शेळके, राजा बढे, सी. रामचंद्र अशी कित्येक नावे आहेत, ज्यांच्या साथीने आशाताईंच्या मराठी संगीतातील योगदानाचा उल्लेख करावा लागतो. ही सारी अत्यंत प्रतिभावंत मंडळी. गीतकाराच्या शब्दांना आवाज देणे किंवा चालीवर गाणे एवढेच गायकाचे काम नसते. शब्दांमागील भाव गायकाला व्यक्त करावा लागतो. सुरात गातानाही शब्दांना न्याय देण्याचे भान गायकाला ठेवावे लागते. आशाताईंनी या प्रतिभावंतांच्या आव्हानांना संधी मानले आणि त्यामुळेच त्या अष्टपैलू गायिका म्हणून प्रसिद्ध झाल्या. संगीत आणि गायकीला जीवन अर्पण केलेली ही गायिका. तिने कधीही कोणत्याही अपमार्गाचा अवलंब करून स्वतःला सिद्ध केले नाही आणि खरोखर काहीतरी नवे सिद्ध करण्याचा प्रसंग आला तेव्हा कोणत्याही आव्हानापासून पळ काढला नाही. त्यामुळेच आशाताईंचा स्वर अनेकदा इतक्या वैविध्याने व्यक्त होतो की, अनेकदा आपल्या कानांवर पडत असलेले 'हे' गाणे नेमके कुणी गायिले, याचा अंदाज येत नाही. आशाताईंच्या स्वरांची ओळख वेगळी आणि त्यांच्या लकबीची नजाकत वेगळी. एरवी साधे बोलत असतानाच आशाताईंचा खरा आवाज कानांवर पडायचा. गाण्यांतून त्यांच्या लकबी आणि ताना ओळखीच्या झाल्या. कोणत्या शब्दावर भर द्यायचा आणि कुठल्या शब्दांना गाण्यात वाहून जाऊ द्यायचे, याचे कौशल्य आशाताईंच्या अनेक गाण्यांतून दिसायचे. आता गीतकाराचे शब्द अजरामर करणारीच नव्हे तर लौकिकार्थाने काव्य किंवा नादमय नसलेल्या गाण्यातही जीव ओतणारी गायिका आपल्यात नाही. 'एक सौ सोलह चांद की रातें, एक तुम्हारे कांधे का तिल, गीली मेंहदी की खुशबू, झुठमूठ के शिकवे कुछझूठमूठ के वादे भी सब याद करा दूँसब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो', हे गाणे गुलजार साहेबांनी लिहिले होते. १९८७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'इजाजत' या चित्रपटातले हे गीत. या गाण्यासाठी गुलजार यांना सर्वोत्कृष्ट गीतकार आणि आशा भोसले यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार मिळाला होता. पण, मुळात हे गाणेच नव्हते. ते मुक्तंद पद्धतीने लिहिलेले काव्य होते. असे म्हणतात की, गुलजार यांनी हे गाणे आर. डी. बर्मन यांना दाखवले तेव्हा त्यांनी गुलजार साहेबांची गंमत केली होती. आता पेपरातल्या बातमीला संगीत द्यायचे तेवढे राहिले, असे पंचमदा गुलजार यांना म्हणाले होते. कारण या गाण्याचे शब्द गद्यासारखे वाटत होते. त्या गद्याला आशाताईंनी पद्यात उतरवून दाखविले. हजारो गाणी गायिली असली तरी आशाताईंकडे देण्यासारखे खूप काही होते याचा हा पुरावा. आजही ते गाणे कुठे तरी वाजत असते तेव्हा आपसूकच मनात येते की, आशाताई, मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# 'सबसे बडा खिलाडी'

एक काळ होता इस्लामाबादला म्हणजे पाकिस्तानला भारताशी संघर्ष थांबविण्यासाठी वॉशिंग्टनकडे धाव घ्यावी लागत होती. आता काळ बदलला आहे. वॉशिंग्टनला म्हणजे अमेरिकेला स्वतःचे युद्ध थांबविण्यासाठी इस्लामाबादकडे धाव घ्यावी लागली आहे. एका जागतिक महाशक्तीच्या शक्तिवानाचे यापेक्षा अधिक उत्तम उदाहरण कोणते असू शकते?

**मुनीरची मध्यस्थता** : अमेरिका-इस्रायल आणि इराण, लेबनान यांच्यात युद्धविराम घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ती पाकिस्तानचे फिल्ड मार्शल असीम मुनीर यांनी. एक पाय व्हाईट हाऊसच्या दालनात तर दुसरा पाय इराणच्या लष्करात अशी ख्याती असणाऱ्या मुनीर यांनी हा युद्धविराम घडविला.

भारत-पाकिस्तान यांच्यात वाढलेला संघर्ष- प्रारंभी जसा तात्पुरता थांबविण्यात आला व नंतर तो कायम झाला, तसेच या १५ दिवसांसाठी झालेल्या युद्धविरामचे होणार आहे. एखादी लष्करी कारवाई मोहीम १५ दिवसांसाठी स्थगित झाल्यानंतर, ती पूर्ववत पुन्हा सुरू करणे बरेच अवघड असते. त्यामुळे १५ दिवसांत या युद्धविरामला औपचारिकपणे कायम केले जाईल आणि आखाती देशांमध्ये पुन्हा एकदा 'शांतता' नांदू लागेल.

**दबावतंत्र** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी घालून दिलेली मुदत संपण्यास दोन तास बाकी असताना पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी या युद्धविरामाची घोषणा केली. एक विचित्र संयोग म्हणजे भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामाची घोषणा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केली होती तर अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध थांबविण्याची घोषणा पाकिस्तानने केली.

**फिल्ड मार्शल मुनीर** : पाकिस्तानी फिल्ड मार्शल मुनीर यांचे इराणच्या लष्करात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फार घनिष्ठ संबंध आहेत व तेच इराणी लष्कराला युद्धबंदीसाठी राजी करू शकतात असे म्हटले जात होते. फिल्ड मार्शल मुनीर मागील काही दिवसांपासून इराणी लष्करी अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात होते. इराणचे नवे सर्वोच्च नेता मोसाबा खामेनी हे जखमी असून ते एका रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले जाते. या पृष्ठभूमीवर इराणी लष्करी अधिकारीच याबाबत निर्णायक भूमिका घेणार होते. आणि ही बाब असीम मुनीर यांच्या पथ्यावर पडली.

**व्हाईट हाऊस** : दुसरीकडे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्याशीही मुनीर यांची मैत्री झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर ट्रम्प यांनी मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये दुपारच्या भोजनासाठी निमंत्रित केले होते. असा सन्मान मिळालेले हे पहिले लष्करी अधिकारी असावेत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या भाषणांमध्ये मुनीर यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव सुरू केला होता. राष्ट्रपती ट्रम्प यांनाही या युद्धातून सन्मानजनक माघार हवी होती. माघारीचा हा रस्ता मुनीर यांनी खुला करून दिल्यानंतर ट्रम्प यांनी लगेच युद्धबंदीचा प्रस्ताव स्वीकारला. यामागे ट्रम्प यांच्यावर असणारा दुहेरी दबाव हे कारण मुख्य होते.

**दुहेरी दबाव** : अमेरिकेतच त्यांच्याच पक्षाच्या रिपब्लिकन नेत्यांनी ट्रम्प यांच्यावर टीका करणे सुरू केले होते. उपराष्ट्रपती जेडी व्हान्स हे तर तातडीने युद्ध संपविण्याच्या बाजूने होते. अमेरिकेत जनता युद्धाच्या विरोधात जात होती. पेट्रोल-गॅसच्या वाढत्या किमती हे त्याचे कारण होते. अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याला हादरे बसणे सुरू झाले होते. अमेरिकेचे डझनाहून अधिक विमाने व हेलिकॉप्टर्स या युद्धात गमावली आहेत. आखाती देशात असणाऱ्या अमेरिकन लष्करी तळांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले आहे. हा सारा दबाव राष्ट्रपती ट्रम्प यांच्यावर होता. दुसरा दबाव होता तो आखाती भागातील मित्र देशांचा. इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अमिरात, कुवैत, बहरीन, कतार या देशांना 'लक्ष्य' केल्यापासून यांनी अमेरिका-इस्रायलने हे युद्ध लवकर थांबवावे यासाठी अमेरिकेला साकडे घालणे सुरू केले होते. अमेरिकेने खरोखरीच इराणच्या ऊर्जा प्रकल्पांना उद्ध्वस्त करणे सुरू केल्यास इराण आपल्या देशातील ऊर्जा प्रकल्प व पाणी शुद्धीकरण संयंत्रांना लक्ष्य करणे सुरू करील याची भीती या देशांना वाटू लागली होती. आणि प्रत्येक दिवसागणिक ही भीती वाढत होती. इराणी लष्कर ज्या अचूकपणे कतार, कुवैत, बहरीन यांच्या तेल शुद्धीकरण कारखान्यांना लक्ष्य करीत होते त्याची एकप्रकारची धास्ती या देशांनी व अमेरिकेनेही घेतली होती. बहरीन या लहानशा देशात अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय आहे. इराणच्या धसक्यामुळे हे मुख्यालय इतरत्र हलविण्यात आले. इराणी लष्कराला चीनच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा पाठिंबा आहे. हे अमेरिकेच्या व या मित्र देशांच्या लक्षात आले होते. त्यांनी अमेरिकेला लवकरात लवकर हे युद्ध संपविण्याचा सल्ला दिला होता. या संघर्षात अमेरिकेच्या या मित्रदेशांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. ते होत राहिल्यास आपल्या भवितव्यावर परिणाम होईल, हेही या देशांना समजत होते. या साऱ्याचा परिणाम अमेरिकेवर झाला आणि राष्ट्रपती ट्रम्प यांनी एका रात्रीतून इराणला संपविण्याची घोषणा मागे घेतली आणि एका रात्रीच युद्धविरामची घोषणा करण्यात आली.

**चीन-रशिया** : इराणला या युद्धात चीन व रशिया केवळ पाठिंबाच नाही तर संपूर्ण तांत्रिक व लष्करी सहकार्य देत होते. हे आता निर्विवाद समोर आले आहे. त्यावर शिक्कामोर्तब, संयुक्त राष्ट्रातील घटनाक्रमाने केले. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत बहरीनने एक प्रस्ताव आणून होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचा प्रस्ताव आणला होता. १५ सदस्य देशांपैकी ११ देशांनी त्यास समर्थन दिले होते. पण, चीन व रशिया यांनी नकाराधिकार वापरून तो हाणून पाडला.

**चीनची भूमिका** : इराणला युद्धासाठी मदत करणारा चीन आणि युद्धबंदीसाठी राजी करणाराही चीन. या दोन्ही भूमिका चीनने पार पाडल्या असे दिसते. एकीकडे अमेरिकेच्या मित्र देशांना म्हणजे सौदी अरेबिया, बहरीन, कुवैत, कतार यांचे नुकसान करण्यासाठी चीनने इराणला मदत केली. मात्र राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला विनाशाचा- विध्वसांचा निर्वाणीचा इशारा दिल्यानंतर- आपल्या मित्राला म्हणजे इराणला त्यापासून वाचविण्यासाठी त्याला युद्धविरामासाठी राजी करण्यातही चीनची निर्णायक भूमिका राहिली. कारण, इराण हा चीनचा सर्वांत मोठा व्यापार भागीदार आहे. इराण उद्ध्वस्त होणे, इराणची अर्थव्यवस्था कोलमडून पडणे चीनला परवडणारे नव्हते. त्याने लगेच इराणला सावध केले व सावरले. इराणने चीनचे न ऐकण्याचा प्रश्नच नव्हता.

**पाकिस्तानची लॉटरी?** : आखाती देशातील हा घटनाक्रम पाकिस्तानसाठी एक प्रकारची लॉटरी ठरला. त्याने यात महत्त्वाची भूमिका बजावित अमेरिका, चीन व मुस्लिम जगत या तीन आघाड्यांवर आपली छाप सोडली. अमेरिकेची अप्रत्यक्ष मदत केल्यामुळे 'अमेरिका मेहेरबान', मुस्लिम जगतातील संघर्ष थांबविण्यामुळे 'अल्ला मेहेरबान' आणि हे सारे फिल्ड मार्श मुनीर यांनी केल्यामुळे 'आर्मी मेहेरबान'! म्हणजे आखाती युद्ध एक प्रकारे पाकिस्तानच्या पथ्यावर पडले. जगाला विनाशापासून आम्ही वाचविले असा प्रचार करण्यास पाकिस्तान मोकळा राहणार आहे. शिवाय इस्लामी देशात पाकिस्तानची प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावणार ते वेगळेच.

**सबसे बडा खिलाडी** : आखातातील संघर्ष अमेरिका-इस्रायल व इराण-लेबनान- हिजबुल्ला यांच्यात झडला. या साऱ्या संघर्षात 'सबसे बडा खिलाडी' ठरला चीन. त्याने आपल्या अचूक तंत्रज्ञानाची चुणूक अमेरिकेला दाखविली. हेच त्याने भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान केले होते. भारतीय वायुदलाच्या हालचालींची 'लाईव्ह माहिती' चीन, पाकिस्तानला पुरवीत होता. अगदी हेच आखाती युद्धात झाले. चीन इराणला अमेरिकन नौदल व वायुदलाची 'लाईव्ह माहिती' पुरवीत होता. त्या आधारे इराणने, यूएसएस अब्राहम लिंकन, जेराल्ड फोर्ड या जगातील दोन बलाढ्य विमानवाहू जहाजांना लक्ष्य केले होते. त्याचाच फटका अब्राहम लिंकन या जहाजाला बसला व अमेरिकेला ते इराणच्या टप्प्यापासून दूर हलवावे लागले. आजवर जगातील अन्य देशांना युद्ध थांबविण्यासाठी वॉशिंग्टनचा दरवाजा ठोठवावा लागत होता. आणि आता वॉशिंग्टनला युद्ध संपविण्यासाठी इस्लामाबादचा दरवाजा ठोठवावा लागला ही सारी 'करामात' चीनची! आखाती संघर्षात सबसे बडा खिलाडी ठरला-चीन!

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# पोशिंद्याचे उत्पन्न कसे वाढणार?

सरकारने राज्याच्या प्रगतीसाठी ठोस कृती आराखडा आखला असून त्या दिशेने काम सुरू आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक योजना अंमलात आणल्या जात आहेत. सध्या महाराष्ट्राच्या बहुतांश भागात खरीप हंगामाचे नियोजन सुरू झाले आहे. केंद्र सरकारने रासायनिक खतांसाठी ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. यंदा विदर्भात काही शेतकऱ्यांना विक्रमी चणा उत्पादन झाले तर काहींना रोगांच्या प्रादुर्भावामुळे मोठे नुकसान सहन करावे लागले. काही शेतकऱ्यांनी कापसाची फरदळ घेतल्याने आगामी हंगामातही बोंडअळीचा धोका आहे.

तेलबियांच्या लागवडीमुळे शेतीची सुपिकता कमालीची घटल्याने आता पूर्वीप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादन होत नाही. शिवाय पावसाच्या अनियमितपणाचा महाराष्ट्रातील शेतीला सातत्याने फटका बसला आहे. गतवर्षी पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उन्हाळी तिळाची लागवड केली होती. हे एक नगदी पीक आहे. परंतु, गत हंगामात अवकाळी पावसाने सातत्याने मारा केल्याने प्रचंड नुकसान झाले. परिणामी यंदा तिळ लागवड आपोआपच कमी झाली.

सरकारने शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना लागू केल्या असल्या तरी आजही बहुतांश अल्पभूधारकांना दारिद्र्यरेषेखालीच जगावे लागत असल्याने सरकारकडून कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन दिले जात आहे. गरिबांची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी सरकारकडून अनेक कृषिपूरक योजना अनुदानावर राबविल्या जातात. परंतु, योग्य मार्गदर्शन आणि जनजागृतीअभावी उद्दिष्ट साध्य होत नाही, हे तेवढेच सत्य आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अल्पभूधारकांना मोठ्या प्रमाणात दिलासा देणारी ठरत आहे. सरकारने अल्पभूधारकांसाठी सौरकृषिपंप योजना आणली. परंतु, काही लोकांनी वारंवार या योजनेबाबत अपप्रचार केला. स्थानिक समस्या असू शकतात. परंतु, ही योजना सरकारने भविष्यातील समस्या गृहीत धरूनच आखल्याची पावती देण्याची गरज नाही. महाराष्ट्र राज्य खरीप हंगाम २०२६ साठी कृषी विभागाने खतांचे नियोजन आणि संरक्षित साठ्यावर भर दिला आहे. खरीप हंगामाचा कालावधी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ याप्रमाणे निर्धारित करण्यात आला आहे. केंद्र सरकारने ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे खत अनुदान मंजूर केले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत खतसाठा ३.९९ लाख टन इतका वाढल्याने यंदा शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. गरजेनुसार रासायनिक खतांचा साठा उपलब्ध केला जात असला तरी सरकारकडून नैसर्गिक शेतीलाही प्रोत्साहन दिले जात आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून कर्जाच्या खाईतून बाहेर काढणे शक्य होऊ शकते.

शेतीचा खर्च कमी करून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न सरकारकडून होत असला तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मालाच्या दरातील चढउताराचा परिणाम भारतीय शेतीवरही होतो. भारताने तांदूळ निर्यातीत चीनला मागे टाकून आघाडी घेतली आहे. परंतु, सध्या अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने आयात-निर्यात क्षेत्राचा खर्च वाढला आहे. हे युद्ध दीर्घकाळ चालले तर त्याचा परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊन आर्थिक दरवाढीचा वेग मंदावू शकतो. असे झाले तर त्याचे दुष्परिणाम भारतीय शेतीवरही दिसतील.

राज्य सरकारने 'पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' आणल्याने शेतकऱ्यांना बऱ्यापैकी दिलासा मिळत आहे. शेततळे बांधण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना दीर्घकाळापासून अनुदान दिले जाते. परंतु, या योजनेचा उद्देश कितपत पूर्ण झाला, हा अभ्यासाचा विषय आहे. महाराष्ट्रात नदीजोड प्रकल्प शेतीला नवी उभारी देणारा ठरू शकतो. महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यात अशा योजना खूपच प्रभावी ठरू शकतात. सरकारी योजनांचा योग्य वापर आणि पारदर्शक प्रशासकीय व्यवस्था शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी देऊ शकतात. परंतु, अजूनही भ्रष्टाचार आणि लाचखोरीची प्रकरणे वारंवार उघडकीस येतात. सरकारला या समस्येवर मात करावीच लागेल. शंभर टक्के भ्रष्टाचार नष्ट होऊ शकणार नाही. परंतु, भ्रष्टाचार कमी करणे नक्कीच शासन-प्रशासनाच्या हाती आहे. पूर्वीच्या तुलनेत आता भ्रष्टाचार शिथिल झाल्याने शेतकऱ्यांची फसवणूकही कमी झाली आहे. पूर्वी साध्या एका कागदपत्रासाठीही वेठीस धरले जायचे. आता डिजिटलायझेशनमुळे बहुतांश क्षेत्रातील दलालांची साखळी खंडित होऊन वेळ आणि पैशांची बचत होऊ लागली आहे. मात्र, आजही कृषी क्षेत्राला ठोस सुधारणांची गरज आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# डॉ. आंबेडकरांची संवेदनशीलता

महापुरुष हे त्यांच्या कार्यामुळे महानतेला पोहोचलेले असतात. त्यांचे कार्य बघितले की सर्वसामान्य माणसाला असे वाटते की, हा आपल्या सारखाच दिसणारा हाडामासाचा माणूस इतके मोठे कार्य कसे काय करू शकला? परंतु ज्या लाखो अनुयायांनी त्यांचा मार्ग स्वीकारलेला असतो, इतक्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी त्यांच्याकडे अत्यंत संवेदनशील असे मन सुद्धा असते. पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचे नाव आहे. संविधानाची निर्मिती, हिंदू कोड बिलाची मांडणी, समाजातील उपेक्षित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हा सर्वांना सुपरिचित आहे; परंतु त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू, त्यांच्या जीवनातील अनेक खाजगी गोष्टी, सर्वसामान्य जनतेला फारशा माहीत नसतात.

बाबासाहेब लहान असताना त्यांना सुद्धा मुलांसोबत खेळणे, भांडणे, झाडावर चढणे, नदीमध्ये जाऊन मासळ्या पकडणे इत्यादी गोष्टी फारच आवडायच्या. खेळामध्ये क्रिकेट, टेनिस हे त्यांचे आवडते खेळ होते. इतरांसोबत पत्ते खेळणे सुद्धा त्यांना खूप आवडायचे. समुद्रामध्ये तासन्तास डुंबत राहणे हे पण त्यांना आवडायचे. ते एक चांगले चित्रकार सुद्धा होते. त्यांना तबला सुद्धा वाजवता येत होता. एवढेच काय, पण भारताच्या या कायदा मंत्र्यांना स्वयंपाक सुद्धा उत्तम करता येत होता. जरी त्यांनी आयुष्यभर संघर्षाचा बिगुल वाजवलेला असला, तरी सुद्धा मित्र आणि कार्यकर्त्यांसोबत असताना हास्यविनोद करणे हे सुद्धा त्यांना आवडायचे. विदर्भातील ग्रामीण भाषा, बोलीभाषेतील म्हणी या सुद्धा त्यांना तोंडपाठ असायच्या.

जीवनाचा बराचसा कालखंड त्यांचा गरिबीमध्ये गेला होता. तरीसुद्धा विदेशात राहत असताना तेथील लोकांचे नीटनेटके राहणे, उत्तम पोशाख हे सुद्धा त्यांना खूपच आवडू लागले होते. ते नेहमी म्हणायचे की, टाय लावणे अनेकांना जमत नाही, परंतु मी उत्तम प्रकारे तो लावू शकतो. विद्यार्थी म्हणून तर ते फारच हुशार होते; परंतु त्यांचे हस्ताक्षर सुद्धा खूप सुंदर होते. विदेशात राहून तिथल्या लोकांसोबत मिळून मिसळून सुद्धा त्यांनी धूम्रपान किंवा मद्यपानाला स्पर्श केलेला नव्हता.



प्राण्यांबद्दल सुद्धा त्यांना विशेष प्रेम होते. श्वान हा त्यांचा आवडता प्राणी होता. चांगल्या प्रजातीचे श्वान त्यांना आवडायचे. एकदा त्यांनी पाळलेला श्वान आजारी झाला, त्यावेळेस बाबासाहेबांनी त्याची पूर्ण सेवा केली. त्याला दवाखान्यात घेऊन गेले; परंतु शेवटी तो मरण पावला. आपल्या पाळीव श्वानाचा मृत्यू त्यांना हलवून गेला. एखाद्या लहान मुलगा जसा रडावा, त्याप्रमाणे त्यांनी त्याच्या मृत्यूचा शोक केला. एकदा एका गावी गेले असता, त्यांना त्यांच्या एका मित्राने हरणाचे पिल्लू भेट म्हणून दिले होते. बाबासाहेब त्याला आपल्या घरी घेऊन आले. त्याची सर्व प्रकारची व्यवस्था केली. ते हरिण काही दिवस राहिले व नंतर मरण पावले. त्यावेळेस सुद्धा बाबासाहेब खूप दुःखी झाले होते.

त्यांच्या आई-वडिलांबद्दल सुद्धा त्यांच्या भावना फार हळव्या होत्या. आपल्या बालपणीच्या स्वभावामुळे आपण आपल्या वडिलांचे प्रेम ओळखू शकलो नाही, असे त्यांना नेहमी वाटायचे. त्यांची आठवण आल्यावर बरेचदा ते शोकमग्न व्हायचे. कधीकधी स्मशानामध्ये, ज्या ठिकाणी त्यांच्या वडिलांचा अग्निसंस्कार झाला होता, त्या ठिकाणी जाऊन ते आपला काही वेळ घालवायचे. एकदा त्यांच्या मित्रासोबत ते सातारा रोड स्टेशनवर गेले होते. तिथे जवळच असलेल्या एका ठिकाणी ते थांबले व एका मैदानात जाऊन उभे राहिले. त्यावेळेस ते बरेच भावविव्हळ झाले होते. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. त्याबद्दल मित्राने विचारल्यावर ते म्हणाले की, इथेच माझ्या आईचा अंतिम संस्कार झाला होता. इथे जवळच आम्ही एका पडक्या घरात राहत होतो. माझी आई, भाऊ व बहीण गिट्टी फोडण्याचे काम करीत होते. इथल्या जंगलामध्ये मी खूप खेळलो आहे; परंतु अतिशय दुःखाची गोष्ट आहे, की माझी आई आणि वडील दोघेही मी शिकून किती मोठा झालेलो आहे हे बघण्याकरिता जिवंत नाहीत.

त्यांची पत्नी रमाबाई यांच्याबद्दल सुद्धा त्यांच्या मनात अत्यंत प्रेम होते. बाबासाहेब जेव्हा विदेशामध्ये शिकत होते, त्यावेळेला रमाबाई मोलमजुरी करून पैसे साठवीत होत्या व आवश्यक तेव्हा त्यांना पाठवीत सुद्धा होत्या. बाबासाहेब म्हणायचे की, तिने माझ्यासाठी डोक्यावर शेण वाहण्याचे कार्य सुद्धा केलेले आहे. रमाबाईंचे निधन झाले, त्या वेळेला त्यांच्या डोक्याशी बसून त्यांनी खूप शोक केला होता. पत्नीच्या मृत्यूनंतर अनेक दिवस ते शोकमग्न होते. त्यांनी स्वतःला घरामध्ये बंद करून घेतलेले होते. रमाबाईंचे स्वास्थ्य चांगले राहावे, यासाठी त्यांनी आपल्या इच्छांना सुद्धा मर्यादित केलेले होते. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या आपल्या पुस्तकांमध्ये त्यांनी जी अर्पण पत्रिका दिलेली आहे, त्यामध्ये त्यांनी आपल्या पत्नीचा 'रामू'असा उल्लेख करून तिला ते पुस्तक समर्पित केले आहे.

बाबासाहेब जेव्हा कायदा मंत्री होते, त्यावेळेस त्यांचे सुपुत्र भय्यासाहेब यांना दोन व्यापाऱ्यांनी संपर्क केला व त्यांचे काही काम करण्यासाठी ते त्यांना विमानाने दिल्लीला घेऊन आले. दिल्लीला पोहोचल्यावर भय्यासाहेबांनी बाबासाहेबांना, या लोकांना तुमची सही आणि शिफारसपत्र पाहिजे, असे सांगितले. त्यासाठी मी यांना तुमच्याकडे घेऊन आलो आहे, असे भय्यासाहेब म्हणाले. त्यावर बाबासाहेब त्यांना म्हणाले की, ''इथे मी देशाचा कायदा मंत्री आहे, तुझा बाप नाही. तुझा बाप मुंबई दादरमधील राजगृहामध्ये असतो. घरी मी तुझा वडील आहे; इथे जर तू माझ्याकडे आला तर मी देशाचा कायदा मंत्री आहे हे लक्षात ठेव.'' त्यामुळे बाबासाहेबांनी त्यांना त्यांचे काम न करता परत पाठवून दिले. कर्तव्यकठोर, परंतु संवेदनशील मन असलेल्या महामानवाला शत शत प्रणाम.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वानखेडे स्टेडियमचे महत्त्व



कितीही नवी स्टेडियम्स उभी राहिली तरी वानखेडे ते वानखेडेच राहणार असा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वानखेडे स्टेडियमचा केलेला गौरव योग्यच आहे. वानखेडेचे स्थानच अद्वितीय आहे. क्रिकेट इतिहास याच्याशिवाय अपूर्ण आहे असं म्हटल्यास वावगे होणार नाही. या मैदानावर जगभरातील अनेक दिग्गज खेळाडूंनी अविस्मरणीय तुफानी सामने आणि विक्रम घडवून तत्कालीन क्रिकेटप्रेमींना त्या क्षणांचा दिलेला आनंद

## शेतजमिनी अनियंत्रितपणे अकृषक रूपांतरणाचे दुष्परिणाम

दि. ३० मार्च रोजी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी संसदेत कृषीसाठी उपयोगी जमिनीचे अनियंत्रितपणे अकृषीकरण होत असल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचे विश्लेषण त्यांच्या भाषणात केले. मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी निवासी आणि औद्योगिक वापरासाठी वळवल्या जात आहेत त्यामुळे शेती क्षेत्र कमी होऊन अन्न सुरक्षेवर वाईट परिणाम होत आहे. अन्नधान्य निर्यातीवर विपरीत परिणाम व अन्नधान्य दुर्मिळतेमुळे महागाईत अतोनात वाढ होत आहे. शेतकऱ्यांची जमीन विक्री व अकृषक रूपांतर करताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळायला हवा. जमीन गमावल्यामुळे शेतकऱ्याचे

## वाचक पत्रे

करायची याबाबत कडक निकष असणे आवश्यक आहे. गुंतवणूकदार शेतजमीन स्वस्तात विकत घेऊन अकृषक रूपांतरित करून महाग भावात विकून नफाखोरी करतात. यावर कायद्याचे नियंत्रण ठेवावे तसेच नियोजनाशिवाय अकृषीकरणामुळे रस्ते, पाणी, वीज यासारख्या सुविधांची पूर्तता करण्यात समस्या निर्माण होतात. बिल्डर, व्यावसायिकांनी या सर्व विपरीत परिणामांचा विचार न करता अनियंत्रितपणे शेतजमीन अकृषक रूपांतरित करण्याने शहरांचे अमर्याद विस्तारीकरण होत आहे आणि खेड्यातील

## क्रांतीची ठिणगी पेटवणारे थोर क्रांतिकारक दामोदर चाफेकर



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे दामोदर चाफेकर! त्यांचा बलिदान दिवस १८ एप्रिल रोजी साजरा केला जातो. इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवून त्यांनी क्रांतीची पहिली ठिणगी पेटवली. दामोदर चाफेकर आणि त्यांच्या भावांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले.

दिला. या घटनेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण मिळाले आणि क्रांतीची ज्वाला अधिक प्रखर झाली. या घटनेनंतर इंग्रजांनी चाफेकर बंधूंना अटक केली. न्यायालयातही त्यांनी निर्भीडपणे आपल्या कृत्याची कबुली दिली. १८ एप्रिल १८९८ रोजी दामोदर चाफेकर यांना फाशी देण्यात आली.

त्यांच्या बलिदानाने असंख्य भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना निर्माण झाली. देशभक्ती, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांनी दिली. त्या त्यागाची जाणीव ठेवून आजच्या पिढीने प्रामाणिकपणे देशसेवा करणे आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

**प्रिया बागडदेव** / छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परळीत 'कोळशाच्या चुलीचा' सुगंध कायम...माणिक दहिवाळ यांचा चार पिढ्यांपासून गॅसला रामराम!

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ,(श्रीराम लांडगे)** | आधुनिकतेच्या युगात सर्वत्र गॅस सिलेंडरवर अवलंबून असलेली हॉटेल व्यवसायाची साखळी पाहायला मिळते. मात्र परळीत एक असे हॉटेल आहे, जिथे आजही पारंपरिक कोळशाच्या भट्टीवरच चहा आणि नाश्ता तयार होतो आणि तेही गेल्या चार पिढ्यांपासून! दोस्ती टी हाऊसमुळे येथील ग्राहकांना पारंपारिक पद्धतीने बनविलेले पदार्थ खाण्याचे भाग्य या आधुनिक युगातही प्राप्त झाले आहे. त्यामुळे ग्राहक व दोस्ती टी हाऊसचे नाते म्हणजे ही दोस्ती तुटायची नाही असेच झाले आहे.



## चुलीवरच्या नाश्त्याची चवच न्यारी

दोस्ती टी हाऊस गेल्या अनेक दशकापासून परळीकरांच्या सेवेत अविरतपणे सुरू आहे. चुलीवर सकाळची गरमागरम बनवलेली पुरी भाजी, शेव चिवडा, समोसा, भजी, कडी खाण्यासाठी अनेकजण आवडीने या ठिकाणी येत असतात.

परळीतील दोस्ती टी हाऊसचे प्रो.प्रा. माणिक मामा दहिवाळ यांनी आपल्या हॉटेलमध्ये गॅस सिलेंडरचा वापर न करता कोळसा आणि चुलीवरच स्वयंपाक करण्याची परंपरा जपली आहे. बदलत्या काळातही त्यांनी ही पद्धत कायम ठेवत एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

सध्या आखाती देशात चालू असलेल्या युद्धामुळे गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेत येणाऱ्या अडचणींमुळे अनेक हॉटेल व्यावसायिक त्रस्त आहेत. मात्र दहिवाळ यांचे हॉटेल या सगळ्यापासून दूर असून, पारंपरिक पद्धतीमुळे त्यांना कोणत्याही तुटवड्याचा फटका बसत नाही.

विशेष म्हणजे, कोळशाच्या भट्टीवर बनवलेल्या चहाला आणि नाश्त्याला एक खास चव आणि सुगंध असतो. ज्यामुळे ग्राहकांचीही या हॉटेलकडे विशेष पसंती आहे. जुन्या पद्धतीची चव अनुभवण्यासाठी अनेकजण खास येथे भेट देतात.

तंत्रज्ञानाच्या धावपळीत हरवलेल्या पारंपरिक चवीचा वारसा जपणारे माणिक मामा दहिवाळ व त्यांची मुले प्रशांत व प्रमोद दहिवाळ यांच्या हॉटेलने आज परळीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# नि:शुल्क सेवेबद्दल सायली नेत्रालयास डॉ. वसंत मुंडे यांच्याकडून ॲप्रन भेट

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | धाराशिव येथील सायली नेत्र रुग्णालयाचे संचालक डॉ. गोविंदराव कोकाटे यांनी स्व. गोपीनाथरावजी मुंडे स्मृति प्रित्यर्थ नि:शुल्क नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात मौजे कन्हेरवाडीचे डॉ. वसंत मुंडे यांनी एका निराधार व्यक्तीला नेत्र तपासणी शिबिरात पाठवले होते. संबंधित रुग्णांचे डोळ्याचे नि:शुल्क ऑपरेशन डॉ.गोविंद कोकाटे व त्यांच्या टीमने केले होते. काही दिवसांनंतर डॉ. वसंत मुंडे यांनी दि. 9 एप्रिल 2026 रोजी सायली नेत्र रुग्णालयात डॉ. गोविंदराव कोकाटे यांची सदिच्छा भेट घेतली असता ,भेटी दरम्यान स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी डॉ. गोविंदराव कोकाटे यांचे सायली नेत्र रुग्णालयास सन 2011 मध्ये भेट देवून सायली नेत्र रुग्णालयाचे उद्घाटन केल्याचे त्यांनी सांगितले.

# छत्तीसगड जुनिअर चॅम्पियनशिप ; सुमितकुमारची सुवर्ण कामगिरी

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव ( प्रतिनिधी )** | छत्तीसगड येथे ता. ११ एप्रिल रोजी नुकत्याच राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा पार पडल्या. सदरील राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेत ७० किलो वजन गटात शहरालागत असणाऱ्या पुनर्वसित शेलापुरी येथील अष्टपैलू पैलवान सुमितकुमार अप्पासाहेब भारस्कर याने शेवटच्या अंतिम सामन्यात दमदार खेळी करत हरियाणा येथील मल्लास पराभूत करून सुवर्णपदकावर आपल नाव कोरत सुवर्ण कामगिरी केली. सदरील स्पर्धेसाठी कोच नरेंद्र कुमार, समीर देसाई, अनिरुधसर, कांबळे सर यांनी मार्गदर्शण केले.अतिशय संघर्षातून कुठलीही आखीव रेखीव पार्शवभूमी नसताना पैलवान सुमितकुमार भारस्कर याने आपल्या जिद्दीच्या जोरवार



प्रचंड मेहनतीने विविध स्पर्धेत अनेक सुवर्ण पदकांची कमाई केली असून, सध्या सुमितकुमार हा रुस्तुम ए हिंद पै अमोल बचूडे कुस्ती संकुल येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत असून, तो सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.तसेच लवकरच तो आपल्या देशासाठी इंटरनॅशनल खेळणार असून,आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधित्व मिळणार असल्याने या सुवर्ण कामगिरी बद्दल पैलवान सुमिकुमारचे सामाजिक, राजकीय तसेच विविध समाज माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत असून, सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# अनेक वर्षे चळवळीचा अनुभव प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक चेहरा शेकापने दिला

तभा. वृत्तसेवा

**केज** | भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई ॲड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले या नेत्त्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती.



अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच लोक पक्षात उरले आहेत.

आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

# 'छंदोपासना' डॉ अ.द. पत्की यांच्या काव्यसंग्रहाचे अंबाजोगाईत प्रकाशन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)** | अंबाजोगाई येथील डॉ.अ.द. पत्की यांच्या 'छंदोपासना' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती स्नेहलता पाठक होत्या.

या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक रविंद्र तांबोळी, इतिहास संशोधक डॉ.शरदराव हेबाळकर, भारतीय शिक्षण मंडळ (संभाजीनगर विभाग) चे श्री कुलकर्णी, कवी गणपतजी व्यास गुरुजी, कवी डॉ.अ.द. पत्की तसेच प्रकाशिका सौ. लता पत्की मंचावर उपस्थित होते. रविंद्र तांबोळी यांनी आपल्या मनोगतात अंबाजोगाईच्या समृद्ध साहित्य परंपरेचा गौरव करत आद्यकवी मुकुंदराज, सर्वज्ञ दासोपंत, रंगनाथजी तिवारी यांसारख्या साहित्यिकांचा उल्लेख केला. 'छंदोपासना' हा काव्यसंग्रह या परंपरेत निश्चितच भर घालणारा ठरेल,असे त्यांनी सांगितले.

कवी गणपतजी व्यास गुरुजी यांनी या काव्यसंग्रहातील कविता सामाजिक सद्भाव, सदाचार, देशभक्ती आणि सकारात्मक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या असल्याचे सांगितले. त्यांनी यावेळी काव्यगायन करून उपस्थितांची दाद मिळवली.

अध्यक्षीय समारोप करताना स्नेहलता पाठक म्हणाल्या की, अर्थशास्त्राचे प्राध्यापक असतानाही डॉ.पत्की यांनी आपल्या सृजनशीलतेला जपले आहे. सातत्यपूर्ण वाचन आणि लेखनाच्या छंदामुळे 'छंदोपासना' हा उत्कृष्ट काव्यसंग्रह साकार झाला असून भविष्यातही त्यांचे साहित्य असेच समृद्ध होत राहावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्रकाशिका सौ. लता पत्की व डॉ. अ. द. पत्की यांचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी सुरुवातीस सरस्वती प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले .

यावेळी हर्षित निळकरी , श्री जोशी, साईनाथ उपरे , प्रा शिलाताई पाठक , श्रीकांत देशपांडे यांनी छंदोपासना काव्याचा परिचय करून दिला .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा दत्तप्रसाद गोस्वामी , प्रास्ताविक प्रा सतिष हिवरेकर आभार प्रा प्रल्हाद तावरे यांनी मानले तर चिमुकली कल्याणी पत्की हीने श्री मदभगवद्गीतेली श्लोक म्हणून उपस्थितांची मने जिंकली

या कार्यक्रम प्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे माजी कार्यवाह राजाभाऊ धाट , डॉ भाऊसाहेब देशपांडे , प्रा सतिश पत्की . कवी दगडू लोमटे , सामाजिक कार्यकर्ते अक्षय भैय्या मुंदडा ,डॉ अतुल देशपांडे , दीनदयाल नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड मकरंद पत्की,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी , डॉ कमलाकर कांबळे ,गझलकार प्रा मुकुंद राजपंखे याशिवाय अन्य विविध सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक , साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते .

# श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये कलाविष्काराचा दिमाखदार सोहळा; वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

## 64 गीतांवर विद्यार्थ्यांनी धरला ठेका; 'शेतकरी व्यथा' व 'देशभक्ती' नाटिकेने प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या

तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर (प्रतिनिधी )** | येथील श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडले. १० आणि ११ एप्रिल अशा दोन दिवशीय महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. "स्नेह, समर्पण आणि एकजुटीची भावना" या उद्देशाने आयोजित या सोहळ्यात



सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानीच प्रेक्षकांना पाहायला मिळाली.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी धारूरचे नगराध्यक्ष श्री. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. यावेळी अर्जुनराव गायकवाड, नगरसेवक सुधीर शिनगारे, डॉ. मयूर सावंत, माजी सभापती हनुमंत बप्पा नागरगोजे, महारुद्र इंगळे, सचिन डावकर, अप्पाराव राठोड आणि बाजीराव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

दुसऱ्या दिवशी माजी नगराध्यक्ष श्री. स्वरूपसिंह हजारी यांच्या हस्ते सत्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सादेक भाई इनामदार, पत्रकार अतुल शिनगारे, शाकीर सय्यद, गौतम चव्हाण, मिथुन गायसमुद्रे, राजेश चिद्रवार, अजित शिनगारे आणि महेश डूबे उपस्थित होते. शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब राठोड यांनी सर्व मान्यवरांचे यथोचित स्वागत व सत्कार केला.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'श्री गणेशा'च्या वंदनेने सांस्कृतिक कार्यक्रमांचा पडदा उघडला. दोन दिवसांत एकूण ६४ बहारदार गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.

नाटिकांचा प्रभाव: विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'शेतकरी कुटुंबाची व्यथा' आणि 'देशभक्तीपर नाटिके'ने प्रेक्षकांच्या अंगावर शहारे आणले.

वैविध्य: चित्रपटातील गाणी, विनोदी प्रहसन आणि सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिकांनी शाळेचा परिसर दुमदुमून गेला होता.

विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होऊ नये आणि केवळ त्यांच्या कलेचे कौतुक व्हावे, या उद्देशाने शाळेने प्रेक्षकांकडून पैशाच्या स्वरूपात बक्षिसे न स्वीकारता केवळ 'टाळ्यांच्या कडकडाटात' प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले होते. या निर्णयाचे पालकांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पहिल्या दिवशी श्री. भागवत कांदे सर व स्नेहा सिरसट मॅडम यांनी केले, तर दुसऱ्या दिवशी मनिषा आकळे मॅडम व कोमल ठोंबरे मॅडम यांनी अत्यंत प्रभावीपणे धुरा सांभाळली.

गेल्या १५ दिवसांपासून शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा सोहळा यशस्वी झाला. या यशाबद्दल संस्थापक श्री. बाळासाहेब राठोड आणि सौ. राठोड मॅडम यांनी सर्वांचे अभिनंदन करून कौतुक केले.

# बुद्ध,संत कबीर आणि फुले यांना गुरु मानून बाबासाहेबांनी मानव जातीचा उद्धार केला : प्रा संजय बागुल

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना गुरू मानून त्यांच्या समतावादी विचारांचा वारसा पुढे नेत बाबासाहेबांनी मानव जातीचा उद्धार केला असे प्रतिपादन प्रा. संजय बागुल यांनी फुले आंबेडकर जन्मोत्सवात बोलताना व्यक्त केले.

याप्रसंगी अविनाश बनसोडे, रूपचंद कांबळे, चंद्रमणी डोंगरे, विजय पोळ, नगरसेवक सदानंद प्रधान, नगरसेवक रफिक भैया, पत्रकार किशन भदर्गे,पत्रकार प्रा. डॉ.सुदर्शन स्वामी, शिक्षक नेते राजकुमार सोनवणे सर,राजेश पोटभरे,अशोक डोंगरे,लक्ष्मण पोटभरे, अशोक मगर,दीपक टाकणखार, दिनेश निसर्गंध, अतुल भैय्या भदर्गे, विनय पोटभरे, राजू कांबळे यांच्यासह जय भीम नगर फुले आंबेडकर जयंती महोत्सव समिती व सर्व समाज बांधव उपस्थित होते.



जयभीम नगर येथे फुले - आंबेडकर जन्मोत्सवामध्ये ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त 'महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरु का मानले'? याविषयावर प्रा संजय बागुल यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. बागुल म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक मुक्कामी १९५१ साली सांगितले की माझे पहिले गुरु तथागत भगवान गौतम बुद्ध आहेत दुसरे गुरु संत कबीर आहेत व तिसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले हे गुरू असल्याचे सांगितले.

# कर्तव्यासोबतच ज्ञानाची साधना; धारूरचे पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांना 'एलएलएम' पदवी प्रदान

तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर ( प्रतिनिधी )** | पोलीस दलातील अत्यंत व्यस्त आणि जबाबदारीचे कर्तव्य बजावत असतानाही शिक्षणाची ओढ कायम ठेवत, धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी कायद्याच्या क्षेत्रातील सर्वोच्च 'एलएलएम' (LLM) पदवी संपादन केली आहे. नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या एका दिमाखदार पदवी प्रदान सोहळ्यात त्यांना ही पदवी बहाल करण्यात



आली. त्यांच्या या यशामुळे केवळ पोलीस दलातच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पोलीस सेवा ही चोवीस तास सतर्क राहण्याची सेवा मानली जाते. अशा परिस्थितीत स्वतःच्या वैयक्तिक वेळेतून अभ्यासासाठी वेळ काढणे अत्यंत कठीण असते. मात्र, वाघमोडे यांनी कायद्याचे सखोल ज्ञान आत्मसात करण्याच्या ध्येयाने 'एलएलबी'नंतर आता 'एलएलएम' पदवी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. कर्तव्यावर असताना उच्च शिक्षण पूर्ण करून त्यांनी समाजासमोर आणि विशेषतः तरुण पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

पोलीस दलात काम करताना कायद्याचे सूक्ष्म ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. "कायद्याचे रक्षण करताना त्याचे सखोल ज्ञान असल्यास कामात अधिक पारदर्शकता आणि अचूकता येते," हा विचार वाघमोडे आपल्या कृतीतून सिद्ध केला आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे पोलीस दलातील इतर सहकाऱ्यांनाही उच्च शिक्षणासाठी मोठी प्रेरणा मिळणार आहे.

या पदवी प्रदान सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते, ज्यांच्या हस्ते वाघमोडे यांचा गौरव करण्यात आला. धारूर परिसरात या बातमीने आनंदाचे वातावरण असून पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे. एक प्रभावी व्यक्तिमत्व आणि अभ्यासू अधिकारी म्हणून वाघमोडे यांनी मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आहे.

# स्त्री-उद्धाराचे महान शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय संस्कृती ही प्राचीन, समृद्ध ,मूल्याधिष्ठित परंपरावर आधारित आहे. प्राचीन काळापासून महिलांनी कुटुंब व्यवस्थेचे पालन तर केलेच त्याचबरोबर शिक्षण ,समाज सुधारणा ,सांस्कृतिक वारसा जतनामध्ये स्त्रियांचे मोलाचे योगदान आहे. आज प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांचे अग्रगण्य स्थान आहे. हे केवळ आपल्या भारताला लाभलेले विचारवंत, समाजसेवक यांनी केलेल्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे. असेच एक महामानव भारतीय संविधानाचे शिल्पकार, समाजसुधारक, पहिले कायदेमंत्री, मजूरमंत्री, न्याय शास्त्रज्ञ ,अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी तत्त्वज्ञ ,अस्पृश्य, दलित लोकांविरुद्ध होणारे सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी अनेक चळवळी उभारणारे ,महिलां कामगाराच्या हक्काचे समर्थक, विविध क्षेत्रातील योगदानामुळे आधुनिक भारताचे शिल्पकार किंवा निर्माते असे संबोधले जाणारे डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांची आज जयंती. त्यानिमित्त त्यांनी दिलेला मूलमंत्र " शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा " सातत्याने अवलंबला पाहिजे . कोणतेही कार्यपूर्ती म्हटले की त्यातील परिपूर्ण ज्ञान म्हणजेच शिक्षण घेणे गरजेचे आहे त्याचबरोबर संघटित होणे म्हणजेच एकत्रित येऊन विचारविनिमय करणे तर यशस्वी होण्यासाठी प्रत्येक समस्येवर ,परिस्थितीवर संघर्ष करून यश प्राप्त करणे होय.

जातीव्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात आहे हे ज्यावेळेस आंबेडकरांच्या लक्षात आले त्यानंतर त्यांनी हिंदू कोड बिल मधून स्त्रियांना समान अधिकार , संधी , स्वातंत्र्य, भेदभाव मनाई ,विशेष तरतुदी, समान संधी ,सन्मानाने जगण्याचा अधिकार ,राजकीय सहभाग, समान वेतन ,प्रसूती रजा ,मूलभूत कर्तव्य, महिला सुरक्षा ,अन्यायाविरुद्ध लढण्याचे कायदेशीर शस्त्र उपलब्ध करून स्त्रियांचा उद्धार केला .यामध्ये भारतीय महिलांना पुरुषांच्या बरोबरीने कायदेशीर अधिकार मिळाले. सन्मानाने जगण्याचा आणि आर्थिक सक्षम बनविण्यास हिंदू कोड बिल समर्थ ठरले .

यामध्ये स्त्रियांना- घटस्फोटाचा अधिकार, - मालमत्तेत स्त्रियांना वाटा, - वारसा हक्कांमध्ये मुलींना , विधवेला मुलां इतकाच हक्क, - पालकत्व अधिकार, -विधवा पुनर्विवाह अधिकार, अशा प्रकारच्या विविध कलमातून स्त्रियांना समान अधिकाराची प्राप्ती करून दिली. असे एक नाहीत अनेक मोलाचे कार्य डॉ भीमराव आंबेडकरांनी केल्यामुळे त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला . केवळ कायदा ,अर्थशास्त्र ,राज्यशास्त्र नव्हे तर भारताच्या स्वातंत्र्यासाठी विविध क्षेत्रात सामाजिक, राजकीय, महिलांसाठी, अस्पृश्यांसाठी उल्लेखनीय कार्य केले .म्हणूनच द ग्रेटेस्ट इंडियन नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची सर्वश्रेष्ठ भारतीय म्हणून निवड करण्यात आली अशा या महामानवाला आणि त्यांच्या अलौकिक कार्याला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**सौ. मनीषा वासुदेवराव टेकाळे (नाईक) सहशिक्षिका, तालुका अंबाजोगाई।**

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

तभा. वृत्तसेवा

**केज, प्रतिनिधी** | केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये शनिवारी सकाळ१०:०० वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागातील नामांकित श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये शनिवारी सकाळी १० वाजता स्त्री शिक्षणाचे शिल्पकार महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे




पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवन चरीत्रावर सर्व उपस्थित मान्यवरांनी गौरोद्गागार काढले.

यावेळी मा. सरपंच सुनील बापु देशमुख, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, रामभाऊ गलांडे, दत्तात्रय कांबळे, शाळेच्या प्रिन्सीपल सिमा फुटाणे शिक्षीका कोमल कापरे, आरती आचार्य, रेश्मा गायकवाड, प्रियंका शिंदे, वैष्णवी काळे, प्रीती गाते, मनिषा कापरे, अर्चना सपाटे यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जलेश्वर तलावाच्या विकासाला निधी कमी पडू देणार नाही– आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

हिंगोली शहराचे श्रद्धास्थान आणि हिंदू समाजाचे महत्त्वा-चे तीर्थक्षेत्र असलेल्या जलेश्वर तलावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून, या कामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले आहे. तलावाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना लवकरच गती दिली जाईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

गेल्या दोन वर्षांपासून जलेश्वर तलावाच्या सुशोभीकरणाचे आणि संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले आहे. आमदार मुटकुळे यांनी या कामाचा आढावा घेताना सांगितले की, तलावातील मोठ्या प्रमाणावरील गाळ काढण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. तलावाला पूर्ण संरक्षण मिळावे यासाठी पिचिंगचे काम करण्यात आले आहे. तलावाला लागून असलेल्या नाल्याचे बांधकाम पूर्ण झाले असून, पाचवीचे (पायाभूत) कामही अर्ध्यापर्यंत पूर्ण झाले आहे. परिसरात सुरक्षेसाठी आणि सौंदर्यासाठी स्ट्रीट लाईट लावण्याचे काम मागील काळात पूर्ण करण्यात आले आहे. मागील दोन वर्षात आ. मुटकुळे यांनी जलेश्-वर तलावाच्या कामांसाठी वेळोवेळी भेटी दिल्या तसेच निधीसाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर काम झाले असून जलेश्वर तलावाचा परिसर आता स्वच्छ आणि सुंदर दिसत आहे.

तलावाच्या उर्वरित कामांसाठी आणि परिसराच्या पूर्णतः कायापालटासाठी आमदार म ुटकुळे आता राज्य सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. जलेश्वर मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून हिंगोलीच्या अस्मितेचे केंद्र आहे. याच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आपण पालकमंत्री महोदयांकडे 'जिल्हा वार्षिक नियोजन समिती'मधून विशेष निधीची मागणी करणार आहोत. निधी उपलब्ध होताच अर्धवट राहिलेली कामे युद्धपातळीवर सुरू होतील.

तलावाचे पावित्र्य राखून तिथे येणाऱ्या भाविकांसाठी उत्तम सोयीसुविधा निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. गाळ काढल्यामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढली असून, आता सौंदर्यीकरणावर भर दिला जाणार आहे. पालकमंत्र्यांच्या सहकार्याने हा प्रकल्प वेळेत पूर्ण होईल, अशी खात्री आमदार मुटकुळेंनी व्यक्त केली आहे. यावेळी शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, अमोल जाधव, हिंगोलीकरांच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असलेल्या या विषयावर आमदारांनी घेतलेल्या पुढाकारामुळे भाविकांम ध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# सीसीटीएनस कामगिरी हिंगोली जिल्हा परिक्षेत्रात पहिला, राज्यात दुसरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

हिंगोली जिल्हा पोलिस दलातील सीसीटीएनएस विभागाने जानेवारी महिन्यात २०१ पैकी २०० गुण मिळविले असून सीसीटीएनएस कामगिरीमध्ये हिंगोली जिल्ह्याला नांदेड परिक्षेत्रात प्रथम तर राज्यात दुसरा क्रमांक मिळाला आहे.

सीसीटीएनएस कार्यप्रणाली राज्यात सप्टेबर २०१५ पा-सून चालू झाली असून यामध्ये जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांची सर्व कामकाज ऑनलाईन चालते. तक्रारदाराची तक्रार घेवून ऑनलाईन करून गुन्हा दाखल केला जा-तो. गुन्ह्याचा तपास वेळेमध्ये सीसीटीएनएस प्रणालीमध्ये भरण्यात येतो. या प्रणालीद्वारे आरोपींचा पूर्व इतिहास पडताळून त्यांचेवर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधक कारवाई करण्यात येतात. या कामगिरीमध्ये हिंगोली जिल्हा पोलिस दल नांदेड परिक्षेत्रात प्रथम क्रमांकावर तर राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आले आहे. या प्रणालीचे काम नोडल अधिकारी म्हणून अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना हे पाहत आहेत. जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याला सीसीटीएनएस कामकाज करण्यासाठी एक किंवा दोन अंमलदार यांची नियुक्ती केली जाते.

हिंगोली येथील सीसीटीएनएस शाखा ही प्रत्येक महिन्याला देखरेख करीत असते त्यामध्ये जमादार राजु हमाने, राहुल तरकसे, पूजा जाधव यांची महत्वाची भूमिका आहे.

राज्यातील ५३ घटकांच्या सीसीटीएनएस कामगिरीचा आढावा घेवून दर महिन्याला प्रत्येक घटकाला गुणांकन देते. जानेवारी महिन्यात हिंगोली घटकाला सीसीटीएनएस कामगिरीमध्ये २०१ पैकी २०० गुण मिळाल्याने हिंगोली जिल्ह्याची ९९.५० टक्के कामगिरी असल्याने हिंग-ोली जिल्हा नांदेड परिक्षेत्रात पहिला तर राज्यात दुसरा क्रमांकावर आहे.

पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस शाखेचे हेड कॉन्स्टेबल राजु हमाने, राहुल तडकसे, पूजा जाधव तसेच जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सीसीटीएनएस देखरेख अधिकारी, पर्यवेक्षक, अंमलदार या सर्वानी वेळेत सीसीटीएनएस कामकाज केल्याने हे यश मिळाले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १० तास वाचन उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय व रुग्णालय हिंगोली येथे सलग १० तास (सकाळी ८ ते संध्याकाळी ६) अभ्यासाचे उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उपक्रमात संस्थेतील सर्व डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी यांनी सदरील उपक्रमामध्ये सहभाग घेऊन प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी प्रत्यक्ष कृतिशील अभ्यासात्मक अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

उपक्रमात सहभागी सर्वांना निशुल्क चहा-बिस्कीट, फळे, ज्यूस, नाश्ता, जेवण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हिंगोलीतर्फे दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी फक्त अभ्यासाची पुस्तके, साधने सोबत आणावीत. (मध्यवर्ती ग्रंथालय विभागातील उपलब्ध असलेले पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतील.) एप्रिल, मे महिना हा परीक्षांचा काळ आहे हे लक्षात घेता विद्यार्थ्यांनी अभ्यासात्मक अभिवादन करून कठोर, दीर्घ अभ्यासाची प्रेरणा या उपक्रमांम धून घ्यावी यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, बुद्धिजीवी, पालक यांनी उपक्रमास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन अधिष्ठाता डॉ मुंगल यांनी केले आहे.




**हिंगोली– येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त अभा समता परिषद आणि ओबीसी कर्मचारी संघ यांच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक नाईक, चंद्रकांत लव्हाळे, प्रा आर एस यादव, रत्नाकर अडसिरे, जांबुतकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी




हिंगोली– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिबा फ ुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद च्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी समता परिषदचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक चंदू भाऊ लव्हाळे, वनिता ताई गुंजकर, बालाजी सोनवणे भागवत बोधले, वसंत वाघ, अक्षय लव्हाळे, चंदू वाघ, केशवराव जांबुतकर, आत्माराम सातव, बळीराम सातव, लिंबाजीराव थोरे, बाबुराव पारसकर, शामराव राऊत, कैलासराव धामणे, अनिकेत लव्हाळे राजेश गोरे, ज्ञानोबा गव्हाणे, अनंत काकडे, मारुती मोरे, मारुती बनसोडे, साहिल चौधरी, चेतन कोंढाणे, ओमकार खंदारे, स्वराज वाघ, राजू जाधव आदींची उपस्थिती होती.

### हिंगोलीत मोफत आरोग्य व मार्गदर्शन शिबीर



हिंगोली– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील संविधान चौक येथे मोफत आरोग्य शिबिर व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, नगरसेवक रवि वाढे, नगर सेवक सौ. ज्योती बलखंडे, नगर सेवक सौ. कळासरे, माजी नगरसेवक सदाशिव सुर्यतळ, राहुल बांगर, श्रीमती डॉ.बगाटे, डॉ.घबडगे, डॉ.देशमुख, डॉ.प्रा. बलखंडे, प्रा.किशोर इंगोले, प्रा.आशिष इंगळे,प्रा.प्रशांत चाटसे, विशाल इंगोले, मुख्याध्यापक बाबासाहेब इंगोले आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन प्रज्ञासूर्य फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होते.

### ११४ वाहनांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैध वाहतुक करणाऱ्या ११४ वाहनांवर पोलिसांनी कार्यवाही केली.

# उन्हाचा पारा चढला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

मागील आठवड्यात हिंगोली जिल्ह्यात काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्यामुळे तापमानात घट झाली होती परंतु रविवारपासून पुन्हा तापमानात कमालीची वाढ झाली असून ३७ ते ३८ अंशवार पारा चढला आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे शहरातील रस्ते, बाजारपेठ, कार्यालयात शुकशुकाट दिसत असून दुपारी घराबाहेर पडण्याचे नागरिक टाळत आहे. तर दुचाकीस्वार डोक्याला रूमाल बांधून घराबाहेर पडतांना दिसत आहेत. दुसरीकडे थंड पेयाची दुकानात मात्र उन्हापासून विसावा मिळावा यासाठी नागरिक गर्दी करीत असतांना दिसत आ-हेत.

# वसमत शाळा, महाविद्यालय परिसरात खड्डेमय रस्ते आणि घाणीचे साम्राज्य, विद्यार्थी–शिक्षकांचे आरोग्य धोक्यात




**प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी**

खंदारबन रस्ता परिसरातील खड्डेमय रस्ते आणि साचलेल्या घाणीम ुळे निर्माण झालेली दुर्गंधी ही गंभीर बाब ठरत आहे. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी,तसेच बांधकाम विभाग यांनी या समस्येकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे.शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असून, शिक्षक व कर्मचारी वर्गालाही याचा त्रास सहन करावा लागत आहे.

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ एप्रिल**

शहरातील खंदारबन रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून, सर्वत्र खड्ड्यांचे जाळे पसरले आहे. या खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी, चिखल व घाण यामुळे संपूर्ण परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. परिणामी, या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती चिंतेचा विषय ठरत आहे.

या भागात चार शाळा आणि एक महाविद्यालय असल्याने सकाळ-संध्याकाळ विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे, साचलेले पाणी आणि दुर्गंधीयुक्त घाण यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून म ार्गक्रमण करावे लागत आहे. अनेक वेळा वाहनचालकांना रस्ता ओळखणे कठीण होत असून, घसरून अपघात होण्याची देखील परिस्थिती निर्माण झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. साचलेल्या पाण्या व कचरामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असूनही त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे चित्र दिसत आहे.शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होणे ही चिंतेची बाब मानली जात असून, खंदारबन रस्त्यांची सद्यस्थिती विद्यार्थी व नागरिकांसाठी म ोठा त्रासदायक मुद्दा ठरत आहे.

# सिरेहक शाह बाबा तलावाचे काम युध्दपातळीवर सुरू आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडून पाहणी, १४ कोटींचा निधी मंजूर





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

हिंगोली शहराचा ऐतिहासिक वारसा आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सिरेहक शहा बाबा दर्गा परिसरातील तलावाच्या नूतनीकरणाचे काम सध्या अत्यंत वेगाने सुरू आहे. हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी आज या विकासकामाची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहणी केली आणि कामाच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले.

भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी येथील सिरेहक शाह बाबा तलावाच्या कामांची पाहणी केली. या तलावाच्या नूतनीकरणासाठी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री म ाननीय नरहरी झिरवाळ यांनी १४ कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. हा तलाव पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारीत असून, जिल्हा परिषदेमार्फत हे काम पूर्ण केले जात आहे.

जुन्या काळात या तलावाचे बांधकाम करताना त्याला कोणताही मजबूत पाया नव्हता. त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचल्यावर धोका निर्माण होत असे. आता मात्र आधुनिक पद्धतीने खोलवर पाया खोदून अत्यंत दर्जेदार काम केले जात आहे, अशी माहिती आमदार मुटकुळे यांनी यावेळी दिली.

तलावाला लागूनच असलेल्या ऐतिहासिक दर्ग्याला दरवर्षी पावसाळ्यात पुराच्या पाण्याचा धोका निर्माण होत होता. दर्ग्यात पाणी शिरल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान व्हायचे. ही दर्ग्याला संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू आहे. तलावाचे खोलीकरण व मजबुतीकरण केले जात आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

शासकीय कंत्राटदार आसारामजी घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम 'युद्धपातळीवर' सुरू आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी तलावाचा पाया आणि मुख्य भिंतींचे काम पूर्ण व्हावे, यासाठी यंत्रणा दिवसरात्र राबत आहे.

यावेळी नगरसेवक हमीद प्यारेवाले. नगरसेवक ॲड. राजेश गोटे, शासकीय कंत्राटदार आसाराम घुगे. भाजपा शहराध्यक्ष रणजीत पुरोहित, शुसंवर्धन विभाग व जिल्हा परिषदेचे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी आदींची उपस्थिती होती. हिंग-ोली शहराच्या विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या प्रकल्पामुळे परिसरातील जलस्तर वाढण्यास आणि पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

# भार्गव यात्रेचे हिंगोलीत स्वागत

**हिंगोली, १३ एप्रिल**

राज्यातील अहिल्यानगर येथून मध्य प्रदेशातील जानापाव दरम्यान दि १० एप्रिल पासून सुरू झालेली भार्गव यात्रा हिंगोली येथे आली असता या यात्रेचे सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने स्वागत करण्यात आले. ब्राम्हण समाजात एकोपा निर्माण व्हावा व राष्ट्र कार्यासाठी समाजाचे योगदान वाढावे याकरीता गेल्या बारा वर्षापासून परशुमराम प्रतिष्ठान अहिल्यानगर यांच्यावतीने भार्गव यात्रेचे आयोजन करण्यात येते. शिवाजी नगर येथील दत्त मंदिरात या यात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर निसळ, विजय देशपांडे, अतुल शुक्ल, श्रेया देशमुख यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली शहरातील सकल ब्राम्हण समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मेंदूविकार तपासणी शिबिरात ७६ रुग्णांवर मोफत उपचार

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, दिव्यांग सक्षमीकरण व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने थे दिव्यांगजनांसाठी मेंदूविकार अहमदपूर तालुक्यातील किनगाव आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यात ७६ जणांवर उपचार करण्यात आले. तसेच तीन महिन्यांच्या औषधींचेही वाटप करण्यात आले.

संवेदना प्रकल्प हरंगुळ (बु) यांच्या सहकार्याने व जिल्हा परिषदेचे सीईओ राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. उद्घाटन मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. देवाशिष रूईकर, माजी जिल्हा परिषद सदस्य त्र्यंबक गुट्टे, प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जाधव, डॉ. विठ्ठल घुगे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यवस्थापक बसवराज पैके यांची उपस्थिती होती.

शिबिरात लातुरातील मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. देवाशिष रुईकर यांनी रुग्णांची तपासणी करुन उपचार केले. शिबिरात ११० दिव्यांग रुग्णांची तपासणी करण्यात आली.



## विविध वृत्त...

### पत्नीवर तलवारीने हल्ला

लातूर : स्वतःच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत आरोपी पतीने पत्नीच्या डोक्यात तलवारीच्या चपट्या बाजूने डोक्यात मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना लातूरजवळील कळंब रेल्वे गेटजवळील विकासनगर भागात रविवारी (दि.१२) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास घडली.

आरोपी शंकर वसंत श्रीमंगले (वय ४२ रा. सेलू जवळगा, ता. रेणापूर हा. मु. कळंब रेल्वे गेट, विकास नगर, लातूर) हा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेत होता. याच रागातून रविवारी (दि.१२) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास त्याने तलवार सोबत आणली होती. त्याने पत्नीच्या डोक्यात तलवारीच्या चपट्या पात्याने मारून गंभीर जखमी केले.

याप्रकरणी पीडितेचा लहान भाऊ गणेश सुभाष श्रीमंगले (रा. साळे गल्लीहनुमान जवळ, लातूर) यांच्या फिर्यादीवरून आरोपी शंकर श्रीमंगले याच्याविरोधात गुरनं. १९०/२६ कलम ११८ (१), ३५२ (२) व सहकलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल सिद्राम धोपटे करीत आहेत.

### शिवसेनेतर्फे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांचे स्वागत

लातूर : नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांचे स्वागत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, जिल्हा महिला संघटीका डॉ. न शोभा बेंजरगे, उपजिल्हा प्रमुख न बालाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे तालुका प्रमुख शंकर रांजणकर, शहर प्रमुख शिवराज मुगावकर, माधव कलमुकले, महानगर संघटक रवी पिचारे, विधानसभा न प्रमुख राजू कतारे, विधानसभा समन्वयक सोमनाथ झुंजारे, विष्णू कांबळे, उपतालुका प्रमुख मारूती सावंत, सिद्धेश्र्वर जाधव, अहमदपूर तालुका संघटक अनिकेत फुलारी, सारंग आगलावे, पांडुरंग परीट, महेश आगलावे, विष्णू गायकवाड, शहर संघटक प्रदीप उपासे, समन्वयक संतोष माने, सोशल मीडिया प्रमुख अजय घोणे, उपशहर प्रमुख सुरेश शिंदे, विखार देशमुख, अजय क्षीरसागर व शिवसैनिक उपस्थित होते.

### कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर

लातूर : सम्राट अशोक, म. ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत्यांचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, संविधान स्तंभाच्या बाजूस सकाळी ८ ते सायंकाळी ५ दरम्यान, रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

या रक्तदान शिबिरास विविध विभागांतील कर्मचारी, मित्र परिवारातील सदस्य, रक्तदाते व सामाजिक चळवळीतील सर्व शिलेदारांनी उपस्थित राहून रक्तदान करावे. रक्तदान करून गरजवंतांना जीवदान द्यावे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. १४ एप्रिल रोजी आयोजिलेल्या शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष मस्के, राहुल गायकवाड, महेश कांबळे, डी. एस. नरसिंगे, संजय राऊत, छगन घोडके, सतीश मानकुसकर, तुकाराम बलांडे, बळीराम भोगे, बाबासाहेब इंगळे, विशाल जोगदंड, तुळशीराम घोडके, यशवंत सूर्यवंशी, जगन्नाथ ठोंबरे, संजयकुमार सूर्यवंशी, दिलीप गायकवाड, राजकुमार गुंजरगे, महिला आघाडीच्या सुनीता कांबळे, सरोजा भोसले, शीला उघाडे, रंजिता शिंदे, पंचशिला मस्के, जयश्री बनसोडे, वैशाली कांबळे, वनमाला उघाडे, सुरेखा गायकवाड यांनी केले आहे

### डॉ. शिरसीकर यांची ४५० किमी शांतीधम्म पदयात्रा

लातूर : नुकत्याच झालेल्या गुलबर्गा बुद्ध विहार ते हैदराबादमार्गे बुद्धवनम नागार्जुन सागर या शांती धम्म पदयात्रेत होल्डिंग हँड्सचे संस्थापक अध्यक्ष तथा लातूरचे सुपुत्र डॉ. सुरेश शिरसीकर यांनी ४५० किलो मीटरचे अंतर पार केले.

शांती, करुणा आणि मैत्री या पदयात्रेचा संदेश होता. ही शांती पदयात्रा गगन मलिक फाउंडेशन आणि थायलंडच्या दोन संस्थांनी आयोजित केली होती. यात पाच देशातील भिक्खूगण सहभागी झाले होते. थायलंड, व्हिएतनाम कंबोडिया, इंग्लंड, अमेरिका आणि भारत अशा शंभर भिक्खूंचा समावेश होता. गुलबर्गा-कमलपूर-हुमनाबाद-मन्नाखेली-सांगारेड्डी-हैदराबाद-चिंतापल्ली-बुद्धवनम असा मार्ग होता रोज १६, १८ व २३ किलो मीटरचे विश्रांतीचे टप्पे ठेवले होते.

दक्षिणेच्या तापत्या उन्हात यांच्य समवेत डॉ. शिरसीकर यांनी ही ४५० किलो मीटरचे अंतर पार केले. यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिथ शांती, करुणा, मैत्री, प्रेम, माणुसक आणि संविधानाचा संदेश असेल तिथ नेहमीच होल्डिंग हँड्स सहभागी होऊन पाठिंबा देईल, होल्डिंग हँड्सचा उद्देशच्च मानवता आहे, असे डॉ. शिरसीकर यांनी सांगितले. पदयात्रेचे उद्घाटन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरग यांच्या पत्नी राधाबाई खरगे, तेलंगणाचे खनिजमंत्री व्यंकय्या स्वामी यांच्य हस्ते

## दोन वर्षात शंभर टक्के शेत रस्ते पक्के होणार : आ. रमेशअप्पा कराड

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात प्रत्येक मंडळात २५ किलोमीटर रस्त्याचे काम हाती घेतले घेतले जाणार असून येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातला एकही शिव रस्ता शिल्लक राहणार नाही सर्व रस्ते मजबूत होतील असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातील समाधान शिबिरात येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधानाच झाले पाहिजे अडीअडचणी, तक्रारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महार-ाजस्व अभियान अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते सोमवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्या सौ.




छायाताई पद्माकर चिंचोलकर, जिप सदस्य महादेव साळुंके, मंडल अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भादा गावचे उपसरपंच बालाजी शिंदे, सहा. गटविकास अधिकारी मनोज राऊत, तालुका कृषी अधिकारी दत्ता हाके, महावितरणचे आर. एम. शेंडे, महिला व बालविकास विभागाच्या मंदाकिनी हिरके, महादेव गुरुशेट्टे, रविंद्र पाटील, देवराव मोहिते, गिरिधर पवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी अनेक गावचे सरपंच नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या केंद्र आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे. शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिर हा एक त्याचाच भाग आहे. शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे बोलून दाखवले.

समाधान शिबिराचा निश्चितपणे अनेकांना लाभ मिळेल फायदा होईल नागरिकांनी आपल्या तक्रारी अडीअडचणी प्रश्न शिबिरातील संबंधिताकडे मांडावेत दोन दिवसात निकाली निघतील असे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्याकडून योजनेच्या अंमलबजावणीची माहिती दिली काही अधिकार्यांनी मोघम उत्तरे दिली असता माझं समाधान करू शकत नाहीत तर जनतेचे कसे समाधान करणार असा प्रश्न उपस्थित करून चुकीची आणि अपुरी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना यापुढे खपवून घेतले जाणार नाही अशी सर्वांसमोर समज दिली.

अतिक्रमीत झालेले सर्व शेतरस्ते सहज खुले झाले तर ठीक नाहीतर कायदेशीर कार्यवाही करून ३० एप्रिल पर्यंत सर्व शेतरस्ते मुक्त करावेत, कबाल्या अभावी घरकुल मिळत नसलेल्या नागरिकांना शासनाच्या नियमानुसार जागा देऊन घरकुलाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे, शासनाच्या धान्य वाटप यंत्रणेत होणारा काळाबाजार तात्काळ थांबवावा, महावितरणने शेतकऱ्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केल्या.

प्रारंभी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली. शिबिर परिसरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलला भेट देऊन आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले. शेवटी पद्माकर चिंचोलकर यांनी आभार मानले. या समाधान शिबिरात संगायो लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, ट्रॅक्टर वाटप, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भादा महसूल मंडळात असलेल्या २६ गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौरकृषीपंप लाभार्थ्यांसाठी तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१३ एप्रिल : सौरकृषीपंपाबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने लाभार्थी शेतकऱ्यांच्या सौरकृषीपंपाबाबत असलेल्या विविध तक्रारींची दखल घेत महावितरणच्या वतीने गुरूवार ( दि.१५ एप्रिल ते २२ एप्रिल) पासून उपविभागीय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केले आहे. सौरकृषीपंपाबाबत तक्रार असलेल्या लाभार्थ्यांनी याच लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर विभाग अंतर्गत येणाऱ्या लातूर ग्रामीण व मुरूड या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.१५ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. तसेच रेणापूर व औसा उपविभागात गुरूवारी (दि.१६ एप्रिल) तर कासारशिरसी, किल्लारी या उपविभागात शुक्रवारी (दि.१७ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. त्याचबरोबर निलंगा व शिरूरअनंतपाळ उपविभागात सोमवारी (दि.२० एप्रिल) मेळावा आयोजीत केला आहे. तर उदगीर शहर, उदगीर ग्रामीण व देवणी या उपविभागात मंगळवारी (दि.२१ एप्रिल) आयोजन करण्यात आले आहे. तसेच शिरूर ताजबंद व अहमदपूर या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.२२ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे.

दि. १५ ते २२ एप्रिल दरम्यान आयोजीत तक्रार निवारण मेळाव्यास लाभार्थी सौकृषीपंप धारक शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारींचे निव-ारण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारींचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

## रक्तदान करून क्रांतीसूर्याला अभिवादन




त.भा. वृत्तसेवा

लातूर दि १३ एप्रिल : शहराच्या अंजली नगर येथील संविधान बौद्ध विह-ारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात १५ जणांनी सहभागी होत रक्तदान केले.

या विहाराच्यावतीने आयोजित शिबिरात जितेंद्रसिंग जर्नलसिंग ठाकूर, फारूख शेख, विशाल धावारे, अकबर शेख, समीर पठाण, अमित सूर्यवंशी, एजाज शेख, उमेश गायकवाड, जहिरोद्दीन सय्यद आदींनी सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान करून महात्मा फुलेंना अभिवादन केले. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शुभम श्रृंगारे, उपाध्यक्ष अल्ताफ शेख, कोषाध्यक्ष राजखान पठाण, सचिव परमेश्र्वर दरकसे, देवानंद मोठेराव, सहसचिव मोहन भालेराव, रक्त संकलनासाठी संजीवनी ब्लड सेंटरचे किरण कांबळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. सितम सोनवणे, तंत्रज्ञ यांच्यासह अंजलीनगर भागातील नागरिक उपस्थित होते.

## 'भीम के लख्ते जिगर' चित्रपटासाठी ऑडिशन



त.भा. वृत्तसेवा

लातूर दि १३ एप्रिल : 'भीम के लख्ते जिगर' या हिंदी चित्रपटासाठी येथील शिवाजी विद्यालयात कलाकारांची ऑडिशन घेण्यात आली. या ऑडिशनला स्थानिक कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात सुमारे २०० पेक्षा जास्त कलाकारांनी सहभागी होऊन काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यापैकी १२ कलाकारांची चित्रपटासाठी निवड करण्यात आली. नवोदित कलाकारांना मोठ्या पडद्यावर काम करण्याची संधी मिळणार आहे. या चित्रपटाचे लेखक, निर्माता व दिग्दर्शक विलास गाडगे यांनी स्वतः उपस्थित राहून ऑडिशन घेतले. कार्यक्रमाचे आयोजन प्रभाद गौतम व शिव-ाजी कोंडमगिरे रेड्डी यांनी केले होते. शिवाजी विद्यालयाचे संस्था सचिव अजय जाधव, मुख्याध्यापक ज्योत्सना पाटील, प्रशासकीय अधिकारी अशोक तोगरे या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले.

## महापालिकेची कर वसुली मोहीम थंडावली

त.भा. वृत्तसेवा

लातूर दि. १३ एप्रिल : महापालिकेचा आर्थिक गाडा अवलंबून असलेल्या लातूर महापालिकेने गेल्या वर्षी तब्बल ८० कोटी रुपयांची मालमत्ता कर वसुली केली होती. परंतु, यावर्षी निवडणुका आल्याने वसुलीचे उद्दिष्ट गाठता आले नाही. आर्थिक वर्ष संपूनही ५० टक्के शास्ती माफी योजना काही दिवस सुरू ठेवली होती. तरीही केवळ एका कोटीची भर पडली. यामुळे आर्थिक वर्ष २०२५२६ मध्ये केवळ ७६ कोटींचीच मालमत्ता कराची वसुली झाली आहे. आता नवीन आर्थिक वर्षातील कराच्या नोटिसा तयार करण्यास सुरुवात झाली आहे. त्याचप्रमाणे थकबाकीदारांच्या मालमत्ताही सील करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्यावतीने सांगण्यात आले.

शहरात सुमारे ८५ हजार गेल्या आर्थिक वर्षातील वसुली ७६ कोटींमध्येच अडकली मालमत्ताधारकांची नोंदणी आहे. नवीन मालमत्ताधारकांचा सर्व्हे आता करण्यात येणार आहे. त्यानंतर नवीन मालमत्तांची भर पडणार आहे. करदात्यांकडून वर्षाकाठी १२५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल होणे अपेक्षित आहे. परंतु, तो वसूलच होत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या पग-ारीलाही पैसे मिळत नाहीत. यामुळे महापालिकेने वसुलीवर जोर लावला होता. परंतु, यावर्षी गेल्यावर्षीचे ८० कोटी वसुलीचे उद्दिष्ट पालिकेला गाठता आले नाही. यावर्षी तर किमान १०० कोटी कर वसुलीची अपेक्षात असताना उद्दिष्टाच्या तब्बल २५ कोटी रुपयांनी कमी वसूली झाली आहे. सत्ताधाऱ्यांसह विरोधी नगरसेवकांनी राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून निधी खेचून आणण्याची गरज आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : आधुनिक भारताचे सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून महात्मा फुलेंनी शिक्षण, समता व मानवी हक्कासाठी दिलेला लढा ऐतिहासिक असून भारताच्या जडणघडणीत त्यांचे बहुमोल यो-गदान आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे यांनी केले. महात्मा बसवेश्र्वरमहाविद्यालयातील समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा याजनाच्यावतीने आयोजित महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी मुख्यसमन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. व्ही. आर सोनी, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रसायनशाख विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, गणित



विभाग प्रमुख डॉ. सुजित हांडीबाग, प्रा. काशीनाथ पवार, डॉ. संजय गवई, ग्रंथपाल डॉ. प्रमोद सर फि, कार्यालय प्रमुख नामदेव बंदरगे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. प्रकाश राठोड यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. समाजक्रांतीचे जनक, थोर विचारवंत आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व क्रांतिवा ज्योतिबा फुले सर्व भारतीयांचे भूषण आहेत. स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांनी सावित्रीमाईंच्या सोबतीने समाजपरिवर्तनाचा जो आदर्श उभा केला, तो आजही अजोड आसल्याचे सांगून प्राचार्य डॉ. डॉगरगे म्हणाले की, आधुनिक भारताच्या जडणघडणीत स्त्रियांना बरोबरीचे स्थान देणाऱ्या या महान क्रांतिकारकाचे विचार आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आ-हेत. असेही ते म्हणाले यावेळी समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने यांनी महात्मा ज्योतिवा फुले यांच्या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा लेखाजोखा सभागृहासमोर मांडला. तसेच प्रा. काशीनाथ पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गवई यांनी केले, सूत्रसंचालन कार्यालयीन प्रमुख नामदेव बंदरगे यांनी केले तर आभार प्रा. आशिष स्वामी यांनी मानले.

### जनकल्याण निवासी विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त

## दयानंद विज्ञानमध्ये व्याख्यान, निबंध स्पर्धा

त.भा. वृत्तसेवा

लातूर १३ एप्रिल : दयानंद विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता कार्यक्रम अंतर्गत दोन दिवसीय उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. ८०० ते १२०० शब्द मर्यादेत असलेल्या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. भारतीय संविधान मूलभूत अधिकार आणि कर्तव्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते. व्याख्याते म्हणून डॉ. युवराज सारणीकर म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. भारतीय राज्यघटनेमुळेच सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार मिळाला. तसेच भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेले सर्वोच्च हक्क आहेत. या मूलभूत अधिकार व कर्तव्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशा ही बळकट झालेली आहे. राज्याच्या मनमानी कारभारावर निर्बंध घालून कायद्याचे राज्य स्थापन करून सामाजिक व राजकीय समता निर्माण केलेली आहे. भारतीय संविधान हेच लोकशाहीचे खरे आधारस्तंभ आहे. याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्यंकटेश कैले यांनी केले. आभार प्रदर्शन

# डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून समाजाने लेखणी हातात घेतली : कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून समाजातील नागरिकांनी लेखणी हातात घेतली आहे. त्यामुळे शिक्षणातून समाजाची मोठी प्रगती झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने त्यांचे विचार समाजात गेले पाहिजे. त्यासाठी आपण निरंतर वाचन केले पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने समाजात शांतता व सलोखा राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले, महापौर श्रीमती कविता मुळे, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्यासह जिल्हास्तरीय शांतता समितीचे विविध स्थायी-अस्थायी सदस्य, निमंत्रीत सदस्य, विविध धर्मगुरू, नागरिक, पत्रकार आदींची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिल्हा प्रशासनाने विविध चांगली व्यवस्था केली आहे. नांदेड जिल्हा हा चळवळीचा जिल्हा असून विविध सामाजिक कार्यक्रमात, प्रशासनात समाजाचा एकत्रीत सहभाग मोठा असतो. मोठ्या आवाजातील डिजे ऐवजी लेझीम सारखे उपक्रम हाती घेऊन तणाव कमी करुन आनंदात आपण जयंती उत्सव साजरे करू या, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात सीसीटीव्ही प्रणाली आवश्यक असून यासाठी प्रयत्न चालू आहेत. शांतता समितीच्या बैठकीत महिलांचा अधिक सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. नांदेड जिल्ह्यातील कायदा सुव्यस्थेबाबत बैठक काही दिवसात घेतली जाईल. यात विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचा सहभाग असेल. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिल्ह्यात सर्व नागरिकांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शुभेच्छा दिल्या.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर समाजाने चालावे. यासाठी समता, बंधुत्व, एकोप्यातून जयंती आपण साजरी करू या. जयंती काळात युवकांवर योग्य जबाबदारी दिली पाहिजे. उन्हापासून नागरिकांची काळजी घेतली पाहिजे. यासाठी मनपाचे सर्व सहकार्य राहील, असे महापौर कविता मुळे यांनी सांगितले.

सर्वांच्या चांगल्या चर्चेतून योग्य नियोजन पोलीस प्रशासनाकडून केले जात आहे. मिरवणूक मार्गात, परिसरात संपूर्ण व्यवस्था चांगली राहील. मार्गात कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता पोलीस विभागाकडून घेतली जाते. यासाठी पोलीस प्रशासन तत्पर असल्याचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्याची चांगली प्रतिमा कायम आहे. यासाठी आपल्या सर्वांचे योगदान मोलाचे आहे. कायदा सुव्यवस्था चांगली ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपण उत्साहात साजरी करू या. यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. नागरिकांना कोणतीही अडचण आल्यास तात्काळ ११२ या टोलफ्री नंबरवर संपर्क साधावा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त युवक-विद्यार्थ्यांसाठी १८ तास अभ्यासाचा उपक्रम पोलीस प्रशासनाच्यावतीने साजरा केला जाणार आहे. यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या विविध सूचनेसह नागरिकांना जयंती काळात कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता मनपाकडून घेतली जाईल, असे मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले. यावेळी बैठकीत विविध सदस्यांनी उपयुक्त सूचना दिल्या. मिरवणुकीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी अनेक नागरिक बाहेर पडतात. त्यांची सुरक्षा, आरोग्य, पाणी व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरा, स्वच्छता आदी विषयांबाबत सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. विविध विभागांने करावयाच्या व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा या बैठकीत करण्यात आली.

निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रास्ताविकात बैठकी विषयी माहिती दिली तर सदस्य सचिव तथा अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव यांनी नांदेड जिल्ह्यात शांतता कायम राहण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने शांतता समितीची बैठक शांततेत पार पडली असून उपस्थित सर्व सदस्यांचे शेवटी त्यांनी आभार मानले.

# सेवानिवृत्तांचे पेन्शन अडकले बँकेच्या लॉगिनमध्ये; पेन्शनर अडचणीत

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १३ एप्रिल -**

जिल्हा परिषद सेवा निवृत्त शिक्षक अधिकारी कर्मचारी यांचे माहे मार्च पेड इन एप्रिलचे पेन्सेन बँकेच्या लॉगिन मध्ये अडकल्याने पेन्सनर यांना अनेकअडचणीचा सामना करावा लागत आहेत .

गटविकास अधिकारी पंचायत समिती भोकर कडे जिल्हा परिषदकडून वित्तपेन्शन (बजेट) न आल्याने९ एप्रिल पर्यंत बील पास होऊ शकले नाही पण १० एप्रिल रोजी वित्तपेन्शन प्राप्त होताच तात्काळ बील पासकरून माहे मार्च च्या पेन्सेनचा १ कोटी १५ लाखाचा धनादेश तात्काळ बँकेत जमा करण्यात आला पण बँक मॅनेजर यांनी तो धनादेश लॉगिन न करताच ते शनिवार , रविवार सुटी असल्याने सोमवार ची सुट्टी घेऊन निघुन गेले असल्याने त्यांच्या विना पेन्सेन जमा झाले नाही पण शेकडो पेन्सनर पेन्सेन जमा झाले असेल या आशेने सोमवारी पेन्सेन उचलन्यास गेले असता शाखेत पेन्सेन खात्याला जमा झाले नसल्याचे सांगितले पण मंगळवारी डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने शासकीय सुट्टी असल्याने हक्काचे पेन्सेन १५ एप्रिल रोजी मॅनेजर आल्याने सायंकाळी जमा होईल त्यामुळे पेन्सेन उचलता येणार नाही ते १६ एप्रिल रोजी उचलता येणार असल्याने बँक मॅनेजर यांच्या बेजबाबदार पणाचा अनेकांना लॉगिनचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## ‘कोलाज भावनांचा’ कवितासंग्रहास राष्ट्रसंत गाडगे बाबा पुरस्कार जाहीर

**नांदेड** -संवेदनशील कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या कोलाज भावनांचा या कविता संग्रहाला शिर्डी येथील डेबूजी फाउंडेशनच्या वतीने



देण्यात येणारा राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. कोलाज भावनांचा ' हा रुचिरा बेटकर यांचा पहिलाच कविता संग्रह असून मानवी मनातील भावनांचा कोलाहल त्यांनी या कविता संग्रहातून साकारल्या आहेत . त्यांच्या या कवितासंग्रहाची डेबुजी फाउंडेशन च्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. शिर्डी येथे २६ एप्रिल रोजी पार पडणाऱ्या २८ व्या राष्ट्रसंत गाडगे महाराज साहित्य संमेलनात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल साहित्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रुचिरा बेटकर यांचे अभिनंदन केले आहे.

## डॉ.आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**कंधार, दि. १३ एप्रिल** -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कंधार येथील रवींद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून जयंती साजरी केली राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्याच्या हेतूने सामाजिक कार्यकर्ते दिग्विजय कांबळे यांनी कंधार येथील रवींद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वही पेन याचे वाटप करून बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली शैक्षणिक चळवळ चालू ठेवून जयंती साजरी करण्यात आली यावेळी कंधार चे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव ,गंगाप्रसाद यन्नावार ,पत्रकार शुभम केंद्रे, सिद्धार्थ वाघमारे ,मयूर कांबळे, विठ्ठलराव सोनकांबळे ,यांची उपस्थिती होती यावेळी बाबासाहेबांच्या शैक्षणिक धोरणाविषयी माहिती पोलीस निरीक्षक जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिली या कार्यक्रमा वेळी मुख्याध्यापक सुभाष मुंडे ,रोहिदास सूर्यवंशी, एकनाथ तिडके ,सौ मंजुषा यन्नावार ,सौ यास्मिन शेख ,तारकेश तपासे, कु परडवाड त्यांच्या सह पालक, विद्यार्थी शिक्षक वृंद उपस्थित होते..

## भोकर येथे बुधवारी पंडीत दीनदयाळ रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व दिगांबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वा. दिगांबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा/प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

# सहकारातून समृद्धीकडे वाटचाल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ एप्रिल -**

कष्टाने कमावलेल्या धनाची सुरक्षित गुंतवणूक ही प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील आर्थिक गरजा ओळखून बहुराज्यीय संस्थांनी उभारलेली विश्वासार्ह व्यवस्था आज समाजाच्या विकासाचा भक्कम आधार बनली आहे. याच बहुराज्यीय संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ‘सहकारातून समृद्धी’ या संकल्पनेवर आधारित सहकार परिषद आणि कॉफी टेबल बुक प्रकाशन सोहळा आज संभाजीनगर येथील हॉटेल ट्रीट इंपिरियल येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अतुल सावे (इतर मागासवर्ग, बहुजन कल्याण तथा नाविन्यपूर्ण ऊर्जा मंत्री), डॉ. शांतीलाल सिंगी (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन), समृत जाधव (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था) तसेच विवेक जुगादे (सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समिती, महामंत्री, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात ‘सकाळ’ समूहाचे मुख्य संपादक सम्राट फडणीस सर, मराठवाडा संपादक संतोष शालिग्राम सर, मराठवाडा युनिकचे प्रमुख संजय चिकटे सर तसेच दैनिक सकाळचे नांदेडचे उपसंपादक काकडे यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या परिषदेत बहुराज्यीय संस्थांच्या योगदानावर सखोल चर्चा झाली तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका अधोरेखित करण्यात आली.

या सोहळ्यात नांदेड जिल्ह्यातील नामांकित श्रीवेद मल्टीस्टेट को -ऑप क्रेडीट सोसायटीचा विभागीय स्तरावर सन्मान करण्यात आला. हा सन्मान संस्थेच्या प्रेरणादायी प्रवासाची आणि समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची साक्ष देणारा ठरला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारोतीराव गणपतराव कंठेवाड, चेअरमन शंकरराव चांडोळकर, व्हाईस चेअरमन सुदाम पाटील तोडे व कार्यकारी संचालिका सौ. सविता मारोतीराव कंठेवाड यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून राज्यातील उत्कृष्ट बहुराज्यीय संस्थांचा प्रवास,नवउद्योजकांना आर्थिक बळ, ग्राहकांसाठी आकर्षक कर्ज योजना, वर्षाअखेरची संस्थेची आर्थिक स्थिती व त्यांची कामगिरी आणि सामाजिक बांधिलकी जोपासत शेतकऱ्यांसाठी बिबियाने वाटप, तसेच गोसेवा व समाजाला दिलेला आर्थिक आधार यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. या पुस्तकामुळे सहकार क्षेत्रातील सकारात्मक कामाची माहिती व्यापक स्तरावर पोहोचणार असून नव्या पिढीला प्रेरणा मिळणार आहे. एकूणच, सहकार परिषद आणि सन्मान सोहळा हा पतसंस्थांच्या कार्याचा गौरव करणारा ठरला.

# परिस्थितीवर मात करत प्रिया शिवपुजेनी गाठलं यशाचं शिखर

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १३ एप्रिल -**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी यशोगाथा म्हणजे प्रिया श्वेता शिवसांब शिवपूजे हिची. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, आमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या एमबीबीएस बॅच २०२० च्या पदवीदान समारंभात प्रियाने मानाची वैद्यकीय पदवी गोल्ड मेडलसह संपादन करत आपल्या जिद्दीचा ठसा उमटविला.




लहानपणापासूनच शिक्षणाची प्रबळ आवड असलेल्या प्रियाने चौथीमध्ये शिष्यवृत्ती मिळवून आपल्या शैक्षणिक प्रवासाची भक्कम पायाभरणी केली. तिचे प्राथमिक शिक्षण सनराईज इंग्लिश स्कूल, नरसी येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण किड्स किंगडम विद्यालय, नांदेड येथे पूर्ण केले.

कोरोना सारख्या संसर्गजन्य महामारीच्या कठीण काळात अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले असताना, प्रियाने मात्र परिस्थितीवर मात करत अभ्यासात सातत्य ठेवले. या जिद्दीच्या जोरावर तिने ६०० गुणांसह उत्तीर्ण होत वैद्यकीय क्षेत्रातील (एमबीबीएस) शिक्षणासाठी प्रवेश मिळवला. अखेर एमबीबीएस पदवी गोल्ड मेडलसह संपादन करत तिने कुटुंब व परिसराचे नाव उज्ज्वल केले.

प्रियाचे हे यश केवळ वैयक्तिक नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि ध्येयाप्रती निष्ठा असेल, तर यश निश्चित मिळतेयाचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रिया शिवपूजे.

दरम्यान, महाराष्ट्राचे माजी स्वच्छता दूत तथा ज्ञान संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माधवराव पाटील शेळगांवकर,जिजामाता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संजय पा. शेळगांव कर तसेच गुणवंत माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य शिवसांब शिवपूजे यांच्या मित्रमंडळींकडून प्रियाच्या या यशाबद्दल तिचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

तिच्या या यशामुळे उद्याच्या तरुणाईला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# नांदेड जिल्ह्यातील ‘मथुरा-लभान’ गोवंश : महाराष्ट्राचा अभिमान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ एप्रिल -**

नांदेड जिल्ह्यातील ‘मथुरा-लभान’ गोवंशाच्या संवर्धन व संशोधनाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत असून, या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तज्ज्ञांचा गौरव करण्यात येत आहे.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा नुकताच छइऋ्ठ मार्फत आयोजित डजउउ्ह-२०२६ परिषदेत स्मृतिचिन्ह देऊन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत पशुवैद्यक व पशु विज्ञान महाविद्यालय, परभणी येथील पशु अनुवंश व पैदास विभागाचे प्राध्यापक डॉ. पंडित नांदेडकर यांना दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी करनाल येथील खउठ-राष्ट्रीय प्राणी आनुवंशिक संसाधन ब्युरो येथे आयोजित राष्ट्रीय परिषद व पाळीव पशु संवर्धन सोसायटीच्या ददखखख व्या वार्षिक अधिवेशनात ‘मथुरा लभान गोवंश - महाराष्ट्राचा अभिमान’ या विषयावरील मौखिक सादरीकरणासाठी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या यशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी डॉ. पंडित नांदेडकर यांचा सत्कार केला. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. मकरंद खरवडकर, डॉ. श्याम पवळे तसेच मथुरा-लभान पशुपालक उपस्थित होते.

यावेळी डॉ. सखाराम खुणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत ‘मथुरा-लभान’ गोवंशास राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची माहिती सादर केली. तसेच किनवट तालुक्यात सुरू असलेल्या कार्याचा आढावाही मांडण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मथुरा-लभान पशुपालक बालसिंग नानगू खचकड, रा. नागसवाडी, ता. किनवट यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या पशुसंवर्धन कार्याचे कौतुक केले तसेच मथुरा-लभान गोवंशाच्या संशोधन व संवर्धनासाठी शुभेच्छा दिल्या.

# तलाईगुडा येथे श्री भाऊराव गोपालेश्वर महादेव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १३ एप्रिल -**

तालुक्यातील तलाईगुडा येथे श्री भाऊराव गोपालेश्वर महादेव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याला अध्यात्मिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती.

**संत-महंतांचा आशीर्वाद**

सोहळ्यास आध्यात्मिक अधिष्ठान लाभावे यासाठी विविध संत-महंतांची उपस्थिती लाभली. यात श्री गंगेश्वर महाराज (मदनापूर), श्री संत लिंगानाथ महाराज (श्री दत्ता देवस्थान चिंचोली मठ) तसेच श्री कैलास मेश्राम महाराज (श्री सुरोजी बाबा सेवा आश्रम, महागाव) यांनी उपस्थित राहून भाविकांना आशीर्वाद दिला.



**मान्यवरांची उपस्थिती**

या धार्मिक कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून खासदार नागेशजी घोडाम (आदिलाबाद), आमदार भीमरावजी केराम (किनवट/माहूर), जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धनजी मुंडे, गोपाल फाउंडेशनचे प्रल्हादरायजी अग्रवाल तसेच एकल ग्राम संघटन नागपूरचे संरक्षक रामभाऊ मातोडे उपस्थित होते.

**संघटनांचा सक्रिय सहभाग**

या सोहळ्यात एकल अभियान समिती, विश्व हिंदू परिषद, देवगिरी कल्याण आश्रम आणि संघ परिवाराशी संबंधित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. विभाग संघ चालक संतोषजी तिरमनवार, प्रांत उपाध्यक्ष उत्तमरावजी धुमाळे, अंचल अध्यक्ष अनिरुद्धजी केंद्रे, उपाध्यक्ष गजाननजी चाडावार, सचिव रमेशचंद्रजी दारमवार, तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**स्थानिकांचे योगदान गौरविले**

मंदिर उभारणीसाठी अग्रवाल परिवार आणि पेंदोर परिवार (तलाईगुडा) यांनी दिलेल्या भरीव आर्थिक व सामाजिक योगदानाबद्दल यावेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

**भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

मांडवी, किनवट परिसर तसेच तलाईगुडा, शामपूर, मिनकी, पिंपळगाव आणि लिंबगुडा येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण परिसर हर हर महादेव च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

